म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 1222

सन १९५०

…ी शुद्धे । उदारे प्रसिद्धे ।
…अनवरत आनंदें । वर्षतिये ॥

ज्ञानेश्वरी १२१

या ओवीवरील

# प्रवचन

प्रा. सोनोपंत दांडेकर

*

प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी, प्रसाद प्रकाशन,
… सदाशिव पेठ, पुणें २.

*

REFBK-0010892

किंमत ८ आणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८५४८
वि: ...
नों: दि: २८/३/८०
REFBK-0010892

# जयजय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे
# अनवरत आनंदें । वर्षातिये

॥ ज्ञा. १२-१ ॥

या ओवीवरील प्रवचन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें (स्थळ प्रत)

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

प्रस्तुत प्रवचनाची ओवी ही ज्ञानेश्वरमहाराजांनीं सुप्रसिद्ध अशा ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायाच्या प्रारंभीं ज्या कांहीं नमनात्मक ओव्या लिहिल्या आहेत, त्यांतील ही पहिली ओवी आहे.

गीतेचा ५ वा अध्याय हा जसा 'कर्मयोगो विशिष्यते' (गीता ५–२) यामुळें महत्त्वाचा गणला जातो, त्याचप्रमाणें गीतेचा १२ अध्याय हा उपासनाकांड व ज्ञानकांड या दोहोंना जोडणारा असा जोड-अध्याय असल्यामुळें त्यालाहि एक प्रकारचें विशिष्ट महत्त्व प्राप्त झालें आहे. तसेंच या अध्यायांत भगवंतांनीं उपसनामार्गाचें रहस्य ग्रथित केल्यामुळें या अध्यायास 'भक्तियोग' असें अन्वर्थक नांव देण्यांत आलें आहे. ('भक्तियोगोनाम

द्वादशोऽध्यायः ’). याशिवाय या अध्यायाच्या प्रारंभींच्या नमनांत ज्ञानेश्वरमहाराजांनीं गुरुकृपादृष्टीवर केलेलें माउलीचें रूपक व तद्द्वारां त्यांनीं वर्णिलेलें गुरुमहात्म्य, त्यांनीं गीतेच्या १२ व्या अध्यायांतील कांहीं श्लोकांचे केलेले स्वतंत्र अर्थ, त्यांनीं वर्णिलेली हठयोगप्रक्रिया, त्यांनीं भक्तीस दिलेली कर्माची व ज्ञानाची जोड यामुळें ज्ञानेश्वरांचें व्यक्तिमत्व जसें या अध्यायांत विशेषत्वानें प्रतिबिंबित झालेलें आहे त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायांतील ज्ञानी भक्ताच्या वर्णनांत ज्ञानेश्वरीचा जो प्रसादगुण त्यासहि भरतें आलेलें आहे. यामुळें ज्ञानेश्वरीचा १२ वा अध्याय ज्ञानेश्वरीभक्तांना अत्यंत प्रिय असा झाला आहे.

गीतेचा १२ वा अध्याय हा उपासनाकांड व ज्ञानकांड यांस जोडणारा आहे असें जें वर सांगितलें त्याची स्पष्टता होण्याकरितां ज्ञानेश्वरमहाराजांनीं जी गीतेच्या अध्यायांची संगति लावली आहे ती पहाणें अवश्य आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीं गीतेच्या अध्यायांची संगति कांहीं टीकाकारांप्रमाणें अठरा भागिले तीन म्ह० पहिले सहा अध्याय कर्मकांड, पुढील सहा अध्याय उपासनाकांड व शेवटचे सहा अध्याय ज्ञानकांड अशा प्रकारची लावलेली नाहीं. त्यांच्या मतें गीतेचा पहिला अध्याय हा ‘ शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव ’ म्हणजे गीताशास्त्र कां निर्माण झालें ह्याचा कथाभाग सांगणारा आहे व दुसऱ्या अध्यायांत भगवंतांनीं सांख्यशास्त्राचा अभिप्राय थोडक्यांत पण स्पष्टपणानें सांगितला आहे (‘ तरी पहिला जो अध्यावो । तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो । द्वितीयीं सांख्यसद्भावो । प्रकाशिला ॥’ ज्ञा. १८–१४३१ ). तिसरा अध्याय हा केवळ कर्मकांडात्मक असून तिसऱ्या अध्यायांतील कर्माचाच विचार भगवंतांनीं गीतेच्या ४ थ्या अध्यायांतील २३ व्या श्लोकाच्या अखेरपर्यंत सांगितला आहे (‘ ऐसेनि सद्भावें कर्म करावें । हा तिजा अध्यायो जो देवें । निर्णयो केला तें जाणावें । कर्मकांड येथ ॥ ’ ज्ञा. १८–१४३९ ). गीतेच्या ४ थ्या अध्यायांतील २४ व्या श्लोकापासून म्हणजे ‘ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ

ब्रह्मणाहुतम् । ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ ' येथपासून तें गीतेच्या १२ व्या अध्यायांतील १२ व्या श्लोकाच्या अखेरपर्यंत म्हणजे ' श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्धानं विशिष्यते । ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥ ' उपासनाकांड आहे. ज्ञानेश्वरमहाराज ' उपासना ' कशाला म्हणतात हें मात्र ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ईश्वरार्पणबुद्धीनें विहित कर्म करणें ह्याला त्यांनीं उपासना म्हटलें आहे (' ऐसी अपेक्षा जालिया । बद्ध मुमुक्षते आलिया । देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया । सांगितली ॥ हेंचि ईश्वरीं कर्मयोगें । भजनकथनाचें खागें । आदरलें शेषभागें । चतुर्थाचेनि ॥ तें विश्वरूप अकरावा । अध्यायो संपे जव आघवा । तंव कर्मे ईशु भजावा । हें जें बोलिलें ॥ ते अष्टाध्यायी उघड । जाण येथें देवताकांड । शास्त्र सांगतसे आड । मोडूनि बोलें ॥ ' ज्ञा. १८-१४४१-४३-४४-४५ ). गीतेच्या १२ व्या अध्यायांतील १३ व्या श्लोकापासून म्ह० ' अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एवच ' तें १५ व्या अध्यायाच्या अखेरपर्यंत ज्ञानकांड आहे (' तें अद्वेष्टादिप्रभृतिकीं । अथवा अमानित्वादिकीं । वाढविजे म्हणोनि लेखीं । बारावा गणूं ॥ तो बारावा अध्याय आदी । आणि पंधरावा अवधि । ज्ञानफळपाकसिद्धि । निरूपणासी ॥ ' ज्ञा. १८-१४४७-४८ ). अशा प्रकारें ज्ञानेश्वरमहाराजांनीं वेदाचीं कर्मादिक तीन कांडें गीतेंतील २ ऱ्या तें १५ व्या अध्यायापर्यंतच विभागून दाखविलीं आहेत. त्यांच्या मतें गीतेचे पुढील १६, १७ व १८ हे अध्याय पुरतीवजा आहेत. ज्ञानाला पोषक अशी दैवी संपत्ति व विरोधक अशी आसुरी संपत्ति १६व्या अध्यायांत सांगितली आहे. सतरावा अध्याय अर्जुनाच्या प्रश्नास उत्तर आहे व त्यांत तीन प्रकारच्या श्रद्धा, यजन व दान इत्यादि विषय सांगितला आहे व १८ वा अध्याय हा कलशाध्याय असून गीतेंतील मागील १७ अध्यायांत सांगितलेलाच विषय भगवंतांनीं या अध्यायांत पुन्हां सूत्ररूपानें सांगितला आहे. एवंच, ज्ञानेश्वरमहाराजांच्यामतें गीतेच्या १२ व्या अध्यायांत उपासना-

कांडाची समाप्ति व ज्ञानकांडास प्रारंभ झालेला आहे. अशा या महत्त्वाच्या अध्यायाच्या प्रारंभीं ज्ञानेश्वरमहाराजांनीं नमन केलेलें आहे.

वास्तविक ग्रंथकार हा सामान्यतः फक्त ग्रंथाच्या प्रारंभींच आपला ग्रंथ निर्विघ्नपणें पार पडावा एवढ्याकरितां आपल्या इष्ट देवतेचें नमन करीत असतो; परंतु ग्रंथाच्या प्रारंभीं, मध्यस्थानीं व अंतिम स्थानींहि मंगल करण्याचा प्रघात क्वचित् ठिकाणीं आढळून येतो. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीं, म्ह० पहिल्या अध्यायाच्या प्रारंभीं, मध्यस्थानीं म्ह० १०व्या अध्यायाच्या प्रारंभीं नमन केलें आहे व ग्रंथसमाप्तीपूर्वीं मंगलवर्षी पसायदान मागितलेलें असून ग्रंथाचा शेवटहि श्रीनिवृत्तिनाथांच्या आशीर्वादांत व सर्व भूतांचें सुख इच्छिण्यांत झाला आहे. ग्रंथाच्या आदि, मध्य व अंतीं नमन केलें असतां ग्रंथकर्त्याचें आयुष्य वाढतें व ग्रंथ समाप्तीच्या आड येणाऱ्या विघ्नांचा नाश करण्याचें पौरुष म्ह० सामर्थ्य त्याला लाभतें असें पतंजलीनें याबाबतींत म्हटलें आहे ('मंगलादीनि मंगलमध्यानि मंगलांतानिच शास्त्राणि प्रथंते। आयुष्यमत् पुरुषकाणि वीरपुरुषकाणिच भवंति ॥').

परंतु ज्ञानेश्वरमहाराज जें वारंवार नमन करतात त्यांत त्यांचा मुख्यतः एकच उद्देश दिसून येतो व तो हाच कीं, आपणांस गुरुप्रसाद प्राप्त व्हावा व तद्द्वारां ग्रंथ लिहिण्यास अवश्य असणारी जी काव्यस्फूर्ति तिचा आपणास सतत लाभ व्हावा व ग्रंथ लिहीत असतांना योग्य शब्द व योग्य अलंकार यांची आपणांस वानवा पडूं नये. आपणांस गुरुप्रसाद प्राप्त व्हावा हाच जरी या नमनांचा मुख्य हेतु असला तरी ज्ञानेश्वरमहाराजांनीं कित्येक वेळां नमनांतून गुरुस्तवनाबरोबर अध्यायसंगतीहि सांगितलेली आहे. एका अध्यायापासून दुसरा अध्याय कसा निघाला, हें सांगणें व तद्द्वारां ग्रंथाची सुसंगति दाखविणें ही एक प्रकारची जबाबदारी टीकाकारावर असते. हें जाणून ज्ञानेश्वर-

महाराजांनीं कित्येक वेळां नमनांतून अध्यायसंगतीहि सांगितलेली आहे; परंतु ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायाच्या नमनांत ज्ञानेश्वर-महाराजांनीं अध्यायसंगति सांगितलेली नाहीं. कारण गीतेच्या १२ व्या अध्यायाची निर्मिति ही अर्जुनानें त्या अध्यायाच्या प्रारंभीं विचारलेल्या प्रश्नामुळेंच झालेली असल्यामुळें अध्याय-संगति सांगण्याचें कांहीं कारणच उरत नाहीं. म्हणून ज्ञानेश्वर-महाराजांनीं १२ व्या अध्यायाच्या प्रारंभींच्या नमनांत आपल्या गुरूचें महात्म्य सांगितल्यानंतर आपला ग्रंथ सर्व गुणमंडित व्हावा एवढयाकरितां त्यांच्याजवळ साहित्यसंपत्तीची मागणी केली आहे व एका दृष्टीनें उत्कृष्ट ग्रंथाची आपली कल्पना मांडली आहे. ( ' नवरसीं भरवीं सागर । करवीं उचित रत्नांचे आगर । भावार्थांचे गिरिवर । निफजवीं माये ॥ साहित्यसोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया क्षोणी । विवेकवल्लीची लावणी । हों देईं सैंघ ॥ ' ज्ञा० १२–११–१२ ).

ज्ञानेश्वरमहाराजांनीं नमनांतून जें वारंवार गुरुस्तवन केलें आहे तें व्याजोक्त नसून अगदीं यथार्थ म्हणजे वास्तव आहे. कारण ज्ञानेश्वरमहाराजांची अशी दृढ समजूत होती कीं, आपणांकडून ही जी गीतेवर अलौकिक टीका लिहिली जात आहे, तें आपलें स्वतःचें कर्तृत्व नसून तें केवळ आपल्या गुरूंच्या कृपेचेंच फळ आहे. याबाबतींत त्यांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, ' माझी योग्यता ती काय ! एऱ्हवीं मी तर बोलूनचालून मूर्खच आहें. परंतु गीतेवर टीका लिहिण्याचें हें जें मी धाष्टर्य करीत आहें त्याला जर कांहीं आधार असेल तर तो एकच; व तो म्हणजे संतकृपेचा दिवा माझ्यासमोर लखलखीत तेवत आहे ' ( ' एऱ्हवीं तरी मी मूर्खु । जरी जाहला अविवेकु । तरी संतकृपादीपकु । सोज्वळु असे ॥ ' ज्ञा० १–७६ ). ' आपण पोपटाला जसें शिक-वावें त्याप्रमाणें तो जसा बोलत असतो, त्याचप्रमाणें श्रीनिवृत्ति-नाथांनीं जें मला शिकविलें तेंच मी या ग्रंथद्वारां बोलत आहे ( ' अहो पुंसा आपणचि पढविजे । मग पढे तरी माथा तुकिजे ।

कां करविलेनि चोजें न रिझे। बालका माय।। तेविं मी जें जें बोलें। तें प्रभु तुमचेंचि शिकविलें।।' ज्ञा० ११-१६-१७). किंवा 'कळसूत्राचें बाहुलें त्याला चालविणाऱ्या सूत्राप्रमाणें चालतें, त्याप्रमाणें मला पुढें करून माझे गुरु श्रीनिवृत्तिनाथ या ग्रंथ-द्वारां बोलत आहेत' असेंहि श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं म्हटलें आहे ('साहिखडेयाचें बाहुलें। चालवित्या सूत्राचेनि चाले। तैसा मातें दावित बोले। स्वामी तो माझा।।' ज्ञा० १८-१७६८). म्हणूनच ज्ञानेश्वरमहाराज वारंवार नमन करतात व गुरूंजवळ कृपेची मागणी करतात. त्यांचेंच रूपक घेऊन सांगावयाचें तर ते म्हणतात—'मीं ग्रंथ लिहिण्याचा व्यापार जो हातांत घेतलेला आहे तो फलद्रूप होण्याकरतां आपण सावकार बना व मला कृपा-रूपी भांडवल द्या' ('तरी तूं जैसा आहासि तैसिया। नमो जी श्रीगुरुराया। मज ग्रंथोद्यमु फळावया। वेव्हारा होईं।। आतां कृपा-भांडवल सोडीं। भरीं मति माझी पोतडी।।' ज्ञा० १४-१६-१७).

या नमनांत ज्ञानेश्वरमहाराजांनीं गुरूंजवळ मागणी करण्या-पूर्वीं गुरुमाउलीचें वर्णन केलें आहे पण तें त्यांच्या स्थूल देहाचें नव्हे. कारण ज्ञानेश्वरमहाराज आपले गुरु जे श्रीनिवृत्तिनाथ त्यांना साक्षात् ब्रह्मच समजत होते ('यदक्षरमनाख्येयमानंद-मजकेवलम्। श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये।।'—अमृ० १). म्हणून त्यांनीं आपल्या गुरूंच्या स्थूल देहाचें (म्हणजे ते गोरे होते, कां काळे होते इत्यादि) वर्णन कोठेंहि केलेलें नाहीं. त्यांनीं त्यांच्या तात्त्विक स्वरूपाचें म्हणजे निर्गुण स्वरूपाचेंच वर्णन नमनांतून ठिकठिकाणीं केलेलें आहे. हें स्वरूपवर्णन करतांना त्यांनीं प्रायः रूपक अलंकाराचाच उपयोग केला आहे. कोठें त्यांनीं आपल्या गुरूंचें वर्णन सूर्याच्या रूपकानें, कोठें आचार्यांच्या रूपकानें व कोठें गणपतीच्या रूपकानें केलें आहे. परंतु या १२ व्या अध्यायाच्या नमनांत ते आपल्या गुरूंचें वर्णन आईच्या रूपकानें करतात.

ज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या गुरूंचें तात्त्विक स्वरूप वर्णन करण्याकरितां जीं वेगवेगळीं रूपकें योजलेलीं आहेत, तीं निर्हेतुक नसून त्या त्या अध्यायांत किंवा मागील अध्यायांत जो जो विषय आलेला आहे त्यास अनुरूप अशींच तीं रूपकें आहेत. त्यांच्या मागें कारणपरंपरा आहे व म्हणून खोल अभ्यासाअंतीं हीं रूपकें हेतुपूर्वकच आहेत असें दिसून येतें.

प्रस्तुत १२ व्या अध्यायाच्या नमनांत ज्ञानेश्वर महाराजांनीं आपल्या गुरूंचें नमन आईच्याच रूपकानें कां केलें, यासंबंधीं कांहीं सांगणें शक्य आहे व त्याकरितां गीतेच्या ११ व्या अध्यायांतील विषयाचें सिंहावलोकन करणें अवश्य आहे.

भगवंतांनीं अर्जुनाला गीतेच्या १० व्या अध्यायांत आपल्या विभूति विस्तरशः सांगितल्या. त्या ऐकून अर्जुनाचे ठिकाणीं भगवंताचें हें विराट स्वरूप आपण आपल्या प्रत्यक्ष चर्मचक्षूंनीं पाहावें अशी अचाट इच्छा उत्पन्न झाली. (‘ मियां इहींच दोहीं डोळां । झोंबानें विश्वरूपा सकळा । एवढी हांव तो दैवाआगळा । म्हणऊनि करी ॥ ’ ज्ञा. १०-३३२). त्याप्रमाणें त्यानें भगवंताला विनती केली व भगवंतांनीं त्याला गीतेच्या ११ व्या अध्यायांत आपलें विश्वरूप दाखविलें. अर्जुनानें तें विश्वरूप पाहिलें, परंतु त्याची बुद्धि सदा द्वैतांतच वावरणारी असल्यामुळें व त्यानें तें विश्वरूप प्रथमतःच पाहिलें असल्यामुळें तो अगदीं गांगरून व गोंधळून गेला. तशी त्याची स्थिति होणें अगदीं स्वाभाविक आहे. कल्पना करा कीं, एखाद्या खेडेगांवांत राहणाऱ्या खेडवळ माणसाला प्रथमतःच मुंबईत नेलें व त्याला मलबार टेकडीवरील एखाद्या भव्य बंगल्यांत नेऊन ठेवलें तर तो गांगरून व गोंधळून जातो व इकडे तिकडे बावळटासारखा टकमक पाहातच उभा राहातो, तशीच अर्जुनाची स्थिति झाली. पण त्याचबरोबर त्याला अचंबाहि वाटला. ज्याप्रमाणें एखाद्या हमालाला लॉटरीमध्यें एकदम दहा हजार रुपये मिळाले म्हणजे तो जसा आश्चर्यचकित

होतो व त्याला जसा अत्यानंद होतो, त्याचप्रमाणें अर्जुनाला तें अपूर्व विश्वरूप प्रथमतः पाहावयास मिळाल्यामुळें तो आश्चर्यांत गर्क झाला व त्याला क्षणभर समाधानहि वाटलें. (' प्रथम स्वरूप-समाधान । पावोनि ठेला अर्जुन । सवेंचि उघडी लोचन । तंव विश्वरूप देखे ॥' ज्ञा. ११–१९५). पण पुढें ज्यावेळेस अर्जुनाला त्या भगवंताच्या अक्राळविक्राळ विश्वरूपांत भीष्म, द्रोण वगैरे सर्व गिळंकृत झालेले दिसले व आपणहि त्यांत विरघळून जाणार असें वाटलें, त्यावेळेस तो भयभीत झाला व त्याच्या अंगाला कंप व घाम सुटला व त्यानें भगवंताला आपण सगुण साकार व्हावें अशी विनंती केली. ( ' किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव । तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्राभावो भव विश्वमूर्ते ॥' गीता ११–४६; ' हे विश्वारूपाचे सोहळे । भोगुनि निवाले जी डोळे । आतां होताति आंधळे । कृष्णमूर्तीलागी ॥ ' ज्ञा. ११–६०६ ). भगवंत त्याच्याकारितां सगुण साकार झाले. परंतु तसें होतांना त्यांनीं त्याला दोष दिला. ते म्हणाले, " अर्जुना, अरे ! तूं तर अगदीं गांवढळ दिसतोस. माझें खरें जें विश्वरूप तें टाकून तूं सगुण साकार रूपावर प्रेम करतोस, हें योग्य नव्हें. तसें करणें म्हणजे अंग सोडून छायेला आलिंगन देण्यासारखें आहे." (' परि नेणसीच गांवढिया । काय कोपों आतां धनंजया । अंग सांडोनि छाया । आलिंगितोसि मा ॥ ' ज्ञा०–११–६२९ ).

वास्तविक अर्जुनानें भगवंताला ' मला विश्वरूप दाखवा, ' अशी विनंती केली व म्हणूनच भगवंतानें अर्जुनाला आपलें विश्वरूप दाखविलें. परंतु तें पाहिल्यानंतर अर्जुनानें ' मला हें विश्वरूप नको ' असें भगवंतास सांगितलें. हें अर्जुनाचें नाकारणें कशा-प्रकारचें झालें हें सांगण्याकरितां ज्ञा० म० नीं तीनचार उत्कृष्ट दृष्टांत दिले आहेत. ज्याप्रमाणें एखाद्या वस्तूचा प्रथमतः स्वीकार करावा व मग ती वाईट म्हणून टाकून द्यावी (' वस्तु घेऊनि वाळिजे ' ) किंवा ज्याप्रमाणें अस्सल रत्नांत कांहींतरी खोड काढीत

बसावें ( ' जैसें रत्नासी दूषण ठेविजे ' ) अथवा ज्याप्रमाणे मुलीला प्रथम पाहून मग ती आपल्याला पसंत नाहीं म्हणून सांगावें ( ' नातरी कन्या पाहोनिया म्हणिजे । मना नये हे ॥ ' ज्ञा. ११-६४२ ) तद्वतच अर्जुनानें केलें. परतु हे तिन्ही दृष्टांत ज्ञा० म०ना कमीच वाटलें. कारण ह्या वस्तु ज्या मुळांत निर्माण झाल्या त्या कांहीं घेणाऱ्याकरितां नव्हत. परंतु भगवंतांनीं अर्जुनाला जें विश्वरूप दाखविलें तें केवळ त्याच्या करितांच होतें. म्हणून ज्ञा०म० आणखी एक समर्पक असा चवथा दृष्टांत देतात. कल्पना करा, एखाद्यानें आपल्या कुटुंबाकरितां सोन्याच्या पाटल्या तयार करव्यात, मग तिनें सांगावें कीं, मला ह्या पाटल्या नकोत, मला सोन्याचें फूल पाहिजे; नंतर त्यानें सोनाराकडे जाऊन त्या पाटल्या मोडून सोन्याचें फूल करण्यास त्यास सांगितलें असतां तो सोनार म्हणतो कीं, 'महाराज! तुम्हांला माझ्या श्रमाची कांहीं किंमत आहे कीं नाहीं!' त्यावर तो मालक म्हणतो, " तुला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ? तूं फार झालें तर घडाईची दुप्पट मजुरी घे म्हणजे झालें." ( ' मोडोनि भांगाराचा रवा । लेणें घडिलें आपुलिया सवा । मग नावडे जरी जीवा । तरी आटिजे पुढती ॥ ' ज्ञा. ११-६४४ ). परंतु भगवंताला अर्जुनापासून कशाचीहि प्राप्ति नसतांना ते त्याच्याकरितां सगुण साकार झाले ( ' तैसें शिष्याचिये प्रीती जाहलें । कृष्णत्व होतें तें विश्वरूप केलें । तें मना नयेचि मग आणिलें । कृष्णपण मागुतें ॥ " ज्ञा. ११-६४५ ).

आजपर्यंत जें विश्वरूप भगवंतांनीं कोणालाहि दाखविलें नाहीं, त्या विश्वरूप वस्त्राची घडी भगवंतांनीं अर्जुनाकारितां उलगडली, परंतु तें वस्त्र अर्जुनाला पटलें नाहीं. म्हणून भगवंतानीं ती घडी पुन्हां गुंडाळली. ही गोष्ट प्रेमाखेरीज होणें शक्य नाहीं. या प्रेमाला योग्य दृष्टांत एक आईचाच ज्ञा०म०ना दिसला. आई हीं मुलानें बदामाच्या वड्या मागितल्या असतां, पायाखालीं स्टूल घेऊन उंच फळीवर ठेवलेल्या बदामाच्या वड्या त्याला काढून देते. परंतु इतक्यांत त्या मुलाची लहर फिरली. " ह्या बदामाच्या वड्या नकोत, मला

श्रीखंडाच्या वड्या दे" म्हणून तें रडूं लागलें तर आई त्याच्यावर रागावते, प्रसंगविशेषीं त्याला कार्ट्या, मेल्या इत्यादि शिव्याहि देते, पण मुलावरील प्रेमामुळें तिला त्या मुलाचा बालहट्ट पुरविल्याखेरीज रहावत नाहीं. मग ती पुन्हां पायाखालीं स्टूल घेऊन त्या बदामाच्या वड्या ठेवून देते व श्रीखंडाच्या वड्या काढून देते. हें सर्व एका आईच्याच ठिकाणीं शक्य आहे ('देखा बालकाचिया घणी धाइजे। कां शिष्याचेनि जाइलेपणें होईजे। हें सद्गुरूचि एकलेनि जाणिजे। कां प्रसवातिया॥' ज्ञा. ८-५५).

वास्तविक ज्ञान प्राप्त करून घेण्याकरितां गुरूंची कष्टतर सेवा करावी लागते. याबाबतींत कर्ण व उपमन्यु यांचीं उदाहरणें प्रसिद्धच आहेत. शिवाय अशी कष्टतर सेवा करूनहि गुरु जर प्रसन्न झाले व त्यांना ज्ञान सांगा अशी जर विनंती केली तरच ते ज्ञान सांगतात ('तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः॥' गीता ४-३४; 'मग अपेक्षित जें आपुलें। तेंहि सांगती पुसिलें। जेणें अंत:करण बोधलें। संकल्पा नये॥' ज्ञा. ४-१६८). परंतु अर्जुनाचे बाबतींत सर्वच कांहीं उलटें दिसून आलें. अर्जुन जरी रागावला तरी तें सर्व सहन करून त्याचे गुरु श्रीकृष्ण, तो म्हणेल तें करण्यास तयार होतात. अशाप्रकारचें हें गुरुशिष्यांचें अद्वितीय प्रेम पाहून ज्ञा० म०चे ठिकाणीं त्यांच्या गुरूबद्दल असलेलें प्रेम जागृत झालें ('हा ठायवरी शिष्याची निकसी। सहाते गुरू आहाती कवणे देशीं। परी नेणिजे आवडी कैशी। संजयो म्हणे॥' ज्ञा. ११-६४६) व हा अकराव्या अध्यायांतील प्रसंग त्यांच्या डोळ्यासमोर होता म्हणून १२ व्या अध्यायाच्या प्रारंभीं ज्ञा० म० आपल्या गुरूंचें नमन आईच्या रूपकानें करतात.

ज्ञानेश्वरमहाराजांनीं या ठिकाणीं जें आईचें रूपक केलेलें आहे तें सांग रूपक आहे व तें अत्यंत उत्कृष्ट झालें आहे. आई ही ज्याप्रमाणें आपल्या मुलाचे बाबतींत त्याला 'मांडीवर वाढविणें,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
उदारे प्रतिक्रमांक ..२८५८८.. दि: ..१९५६..
क्रमांक ..७२२२.. नों: दि: ..२८।३।५८..



अंगाई गीत गाऊन पाळण्यांत झोंके देणें, त्याच्या अंगावर बिंदली, ताईत, वाकी, सोन्याचा कडदोरा इत्यादि दागिने घालणें, त्याला स्तनपान देणें व निजवणें इत्यादि गोष्टी करते, त्याचप्रमाणें श्रीगुरुरूपी माऊली आपल्या साधकरूपी बालकाला 'मूलाधार चक्रस्थित कुंडलिनी शक्तीच्या मांडीवर वाढविते, हृदयकोशरूपी पाळण्यांत घालून झोंके देते, मनपवनरूपी खेळणीं देते, ऋद्धि-सिद्धीरूपी दागिने अंगावर घालते व जीवनकलेचें दूध पाजते,' व म्हणूनच ज्ञानेश्वरमहाराजांनीं या ठिकाणीं गुरुकृपा दृष्टीला म्हणजे गुरूना आईची उपमा दिली आहे. याशिवाय आई ही मुलाला उदराबाहेर टाकते पण श्रीगुरुरूपी माऊली साधकाला आपल्या उदरांत घेते, म्हणजे त्याला आपल्या आत्मबोधांत समाविष्ट करते. एवढ्याकरितांच नाथमहाराजांनीं जन्म देणाऱ्या आईस सावत्र आई ( कमी कल्याण करणारी म्हणजे प्रेय देणारी ) म्हटलें आहे व श्रीगुरुमाऊलीस सख्खी आई ( म्ह० श्रेय देणारी ) असें म्हटलें आहे ( 'उदराबाहेर घातल्या पाठीं । माता पुत्रस्नेहें कळवळा उठी । बाहेरिलें सूनि आपल्या पोटीं । निजस्नेहें गोमटी गुरुमाता ॥' ए. भा. १३–८७ ) तात्पर्य, आपण संतांना माऊली कां म्हणतों, त्याचें कारण ज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांतच जर पहावयाचें असेल तर तें या १२व्या अध्यायाच्या प्रारंभींचें नमन वाचल्यानें कळून येईल.

देवाचे अवतार असतात व संतांचेहि अवतार असतात, परंतु देव व संत यांच्या अवतारांत फार फरक आहे. दोघांनाहि एकच कार्य करावयाचें असतें व तें म्हणजे जगतांत आनंदाचा प्रसार करणें हें होय. परंतु दोघांच्या कार्य करण्याच्या पद्धतींत मात्र फरक असतो. देवाला दुष्टांचा संहार करावा लागतो परंतु साधूंनीं दुष्टांना मारल्याचें एकहि उदाहरण आढळून येणार नाहीं. ज्ञानेश्वरमहाराजांसारखे संत हे तर प्रत्यक्ष भगवंताचेच अवतार होत. रामयाजनार्दनांनीं आपल्या सुप्रसिद्ध आरतींत ज्ञानेश्वर-महाराजांचें वर्णन केलें आहे. ते म्हणतात, 'लोपलें ज्ञान जगीं ।

हित नेणती कोणी । अवतार पांडुरंग । नांव ठेवियलें ज्ञानी ॥ '. ज्ञानेश्वरमहाराज 'अवतार पांडुरंग' तर खरेच परंतु त्यांनीं किती दुष्टांना मारलें ? तर शून्य. साधूंना आपलें कार्य करण्याकरितां देवाप्रमाणें दुष्टांना मारावें लागत नाहीं. जेथें देवाची शक्ति कमी पडते तेथें साधूंची शक्ति प्रभावी ठरते. यांत देवाला कांहीं कमीपणा आहे असें मात्र नाहीं. ज्ञानेश्वरमहाराजांचाच दृष्टांत घेऊन सांगावयाचें तर, परीस हा लोखंडाचें सोनें करतो, परंतु जगताचा जो व्यवहार चालतो, तो कांहीं परिसावर चालत नाहीं, तर तो सोन्यावरच चालतो. किंवा केवळ प्रकाशावर नजर देऊन आपण वन्हीपेक्षां दीप श्रेष्ठ आहे असें म्हणतों; परंतु वस्तुतः वन्हीच दीपाचें रूप धारण करून प्रकाश पाडीत असतो. तद्वतच हे संत महात्मे भगवंताच्याच चिंतनानें उच्च अशा संतत्वाच्या पदावर आरूढ होतात, परंतु जगताचें कार्य करण्याच्या दृष्टीनें ते जगताला भगवंतापेक्षांहि अधिक उपयुक्त ठरतात.

गीतेवर टीका लिहिण्यांत ज्ञानेश्वरमहाराजांचा जो एकमेव उद्देश होता तो हाच कीं, गीतेचा अर्थ सर्व विश्वांत प्रसृत करून तद्द्वारा सर्व जगताला सुखी करणें हा होय. ('तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं । आनंदाचें आवारूं । मांडूं जगा ॥' ज्ञा० १३-११५९). त्यांचें कार्य म्हणजे नुसती आळंदीच आनंदमय करणें, किंवा महाराष्ट्र अथवा भारत आनंदमय करणें, असें संकुचित नव्हतें. ते 'गीतार्थेंसी विश्व भरूं' व 'आनंदाचें अवारूं । मांडूं जगा' यांत विश्व व जग हे शब्द योजून आपलें कार्य म्हणजे विश्वांतील सर्व मानवांना सुखी करणें हें आहे, असें स्पष्टपणानें सांगतात. या ज्ञानेश्वरी ग्रंथाचे शेवटीं ज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या गुरूंच्याजवळ जें पसायदान मागितलें आहे, तें आपण पहा ! त्यांत ते म्हणतात, 'किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥' (ज्ञा० १८-१७९९)--'फार काय सांगावें ! तिन्ही लोकांनीं सर्वसुखानें पूर्ण होऊन आदिपुरुषाच्या ठिकाणीं अखंडित भजावें.'

त्यांच्यासारख्या महात्म्यांच्या कारुण्याला, दयेला अथवा मैत्रीला बांध असा नसतोच. म्हणून जगाची माउली होण्याची योग्यता ज्ञानेश्वरमहाराजांसारख्या साधूंच्या ठिकाणीं आहे.

संतांना माउली म्हणण्यांत आणखीहि एक दुसरा उद्देश आहे. माउलीच्या अंतःकरणांत आपला मुलगा चांगला असो वा दुष्ट असो पण त्याचें निरंतर कल्याण व्हावें अशीच तळमळ असते. मुलानें तिला जरी कितीहि त्रास दिला, प्रसंगविशेषीं लाथाहि मारल्या, तरी ती त्याला दूर लोटत नाहीं. 'मारीना का लाथा! पण मुलगाच आहे ना!' असेंच ती म्हणते व तशाहि स्थितींत ती त्याचें कल्याणच चिंतिते व त्याकरितां झटतहि असते. आईला त्रास देणें हा जणूं काय आपला हक्कच आहे, असें मुलगा समजतो. त्याप्रमाणें दुर्जनांनीं साधूंना त्रास देणें हा जणूं काय ह्यांचा हक्कच आहे. परंतु दुर्जनांनीं कितीहि जरी त्रास दिला तरी त्यासंबंधीं साधूंची प्रतिक्रिया एकच असते व ती म्हणजे त्यांचें कल्याण इच्छिणें ही होय. म्हणूनच आपण संतांना माउली या नांवानें हांक मारतों.

तरतमभावानें पाहावयाचें तर, आई आणि बाप यांच्यामध्यें बापाचा दृष्टिकोन मुलासंबंधीं थोडा निराळा असतो. बाप हा स्वार्थी असतो. मुलगा मोठा झाला व तो पैसे मिळवूं लागला म्हणजे बापाचा त्याच्याकडे ओढा असतो; बाप त्याच्यावर प्रेम करतो; परंतु आईची जात अगदीं वेगळी! जो मुलगा पंगु, दुर्बल व अशक्त असतो त्याच्यावर आईचें प्रेम अधिक असतें. एखादा मुलगा मोठा होऊनहि जर तो पैसे मिळवत नसला व तो निर्बुद्ध व दुराग्रही असला तर बाप त्याच्यावर प्रसंगविशेषीं रागावतो व म्हणतो, 'मूर्खा! हो घराच्या बाहेर' व त्याला घराबाहेरहि हांकलून देतो. पण आईचें अंतःकरण कळवळत असतें. ती त्या हांकून दिलेल्या मुलाला हळूंच एका बाजूला बोलाविते व म्हणते, "नाऱ्या! रागावूं दे त्यांना रागावले तर. तूं त्यांच्या

समोर उभाच राहात जाऊं नकोस. ते कचेरींत गेले म्हणजे ये तूं घरांत. मी घालीन तुला जेवावयास." अशा आईप्रमाणें साधूंची दुष्ट व खळ या लोकांकडे बघण्याची वृत्ति असते. त्यांना त्यांचा उबग अथवा कंटाळा येत नाहीं ('तेविं उन्मत्तें जगें। जयासि खंती न लगे।' ज्ञा० १२–१६६). ज्याप्रमाणें रोगानें त्रस्त झालेल्या माणसाचा रोग नाहींसा करून त्याला पुष्ट करण्याच्या काळजींत असलेला सद्वैद्य, हा रोगी आपला आहे का परका आहे हें न पाहतां काळजीपूर्वक औषधाची योजना करीत असतो ('आतां कदर्थवित व्याधी। बळीकरणाचिया आधीं। आपपरू न शोधी। सद्वैद्यु जैसा॥' ज्ञा० १६–१४१). किंवा ज्याप्रमाणें चिखलांत रुतलेली गाय ही दूध देणारी आहे कीं भाकड आहे हें न पाहातां सहृदय माणूस तिची ती केविलवाणी स्थिति पाहून कासावीस होतो व तिला एकदम चिखलांतून बाहेर काढतो ('कां चिखलीं रुतली गाये। घड भाकड न पाहे। जो तियेचिया ग्लानी होये। कालाभुला॥' ज्ञा० १६–१४२). त्याप्रमाणें अज्ञान, उन्मत्तपणा वगैरेंमुळें अथवा पूर्वजन्मींच्या खडतर वाईट कर्मांमुळें निंद्यपणाच्या सर्वच बाबतींत जखडलेलीं अशीं दुष्ट व खळ माणसें कशीं सुधारतील याबद्दल साधूंच्या अंतःकरणांत रात्रंदिवस तळमळ असते ('तैसे अज्ञानप्रमादादिकीं। कां प्राक्तनींहि सदोखीं। निंद्यत्वाचां सर्वविखीं। खिळिले जे॥' ज्ञा० १६–१४५). त्यांच्या ठिकाणीं असलेलें वैगुण्य बाजूला सारून त्यांच्यावर दया करणारे असे उदार साधुसंत असतात. हे सर्व गुण ज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या गुरूंच्या स्तवनाकरतां जी ओवी लिहिली आहे व जी वर उद्धृत केली आहे तींत आणलेले आहेत. ती ओवी अशी आहे—

'जयजय वो शुद्धे। उदारे प्रसिद्धे। अनवरत आनंदें। वर्षतिये॥'

खरोखर संतांचें वर्णन ज्ञानेश्वरमहाराजांनींच करावें. त्यांचें वर्णन करण्याकरितां त्यांनीं ज्या उपमा व जीं रूपकें योजलेलीं आहेत तीं अत्यंत आकर्षक व समर्पक अशींच आहेत. खुद्द

ज्ञानेश्वरमहाराजांनींच म्हटलें आहे कीं, मी गीतेंतील प्रत्येक पदाचा अर्थ, मर्म स्पष्ट करणाऱ्या शब्दांनीं आणि उपमा व काव्य यांची रेलचेल करून सांगणार आहें ( ' म्हणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमाश्लेष कोंदाकोंदी । झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी ॥ ' ज्ञा० १३-११६३ ). ज्ञानेश्वरमहाराजांची प्रतिभा फार दांडगी. त्यांनीं काव्य व साहित्य हीं दोन्हीं अक्षरशः आपल्या टीकेंत ओतलीं आहेत व ज्ञानेश्वरमहाराजांचीं अध्यायांच्या प्रारंभींचीं नमनें हीं तर अध्यात्मशास्त्र व काव्य या दोन्ही दृष्टींनींहि अत्यंत अमोल अशीं आहेत. संतांचें वर्णन करण्याचा प्रसंग आला कीं ज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रतिभेला भरती येते.

मूळ गीताग्रंथ म्हणजे अर्जुन व भगवान् श्रीकृष्ण यांच्यांतील मोकळा संवाद होय. तो महामुनि व्यासांनीं गीतेच्या ७०० शें श्लोकांत ग्रथित केला व तो गीतार्थ सांगतांना ज्ञानेश्वरमहाराजांनीं कथापद्धतीचें अवलंबन केल्यामुळें त्यांना हा मूळ संवादात्मक असलेला ग्रंथ अधिक मनोरंजकतेनें सांगतां आला. कथेला नेहमीं विविध स्वभावाचीं पात्रें म्ह० व्यक्ति लागत असतात. गीतेंत भगवान् श्रीकृष्ण व अर्जुन अशी गुरुशिष्यांची जोडी व धृतराष्ट्र-संजय अशी स्वामी-सेवकांचीं जोडी, अशा दोन जोड्या मुळांतच आहेत. परंतु ज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यांत आणखी आपले गुरु श्रीनिवृत्तिनाथ, इतर संत श्रोतृमंडळी व आपण स्वतः यांची भर घातल्यामुळें त्यांना गुरुस्तवन करण्यास व तद्द्वारा संतमाहात्म्य सांगण्यास पूर्ण संधि मिळाली व त्याचा त्यांनीं पुरेपूर फायदा करून घेतला आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या टीकेंत ( म्हणजे ज्ञानेश्वरींत ) श्रोते मधून मधून बोलत असतात. हे श्रोते आमच्यासारखे अज्ञानी नव्हते कीं, ज्यांना ज्ञानेश्वरी वाचूनहि ज्ञानेश्वरमहाराज काय म्हणतात हें समजणें कठीण. त्यांनीं जे श्रोते आणलेले आहेत ते फार उच्च अधिकाराचे आहेत. खुद्द ज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यांचें

वर्णन ठिकठिकाणीं केलें आहे. ते म्हणतात—'तुम्हां सर्वज्ञांचा समाजीं। देयावें अवधान हे माझी। विनवणी सलगीची ॥' (ज्ञा. ९-२). त्यांचे गुरु श्रीनिवृत्तिनाथ व निवृत्तिनाथांसारखे सर्वज्ञ इतर संत त्यांचे श्रोते होते. ते नुसते सर्वज्ञ म्ह० ब्रह्मानुभवी होते एवढेंच नव्हे तर ते श्रोत्रिय, मर्मज्ञ व रसिकहि होते. 'तरि तुम्हां रसिकांजोगें। व्याख्यान शोधावें लागे ॥' (ज्ञा० १३-३३३), असें त्यांनीं त्यांच्या बाबतींत म्हटलेलें आहे. हे मर्मज्ञ व रसिक श्रोते ज्ञानेश्वरमहाराजांविषयीं काय म्हणतात हें पाहाण्यासारखें आहे. आपलेंच रत्न खरें, परंतु तें रत्नपारख्याकडून पारखून घेतलें असतां त्याची खरी किंमत कळते ('पैं आपुलेंचि रत्न थितें। घेपे पारखियाचेनि हातें।' ज्ञा० १८-८८९). नाहींतर सामान्य लोकांना त्याची काय कल्पना येणार. ते सर्व समतावादीच असतात. त्यांना रत्न काय व चकाकणारी गारगोटी काय, हीं दोन्ही सारखींच! आमच्यासारख्याला खरे मोती कोणते व cultured (कृत्रिम) मोती कोणते यांतील फरक कळणारच नाहीं.

परंतु ज्ञा० म० चें जें व्याख्यान चाललेलें होतें त्याची योग्य पारख करणारे असे मर्मज्ञ संत श्रोते त्यांच्यासमोर बसलेले होते. ते त्यांच्या व्याख्यानानें संतुष्ट होऊन मधूनमधून प्रशंसोद्गार काढीत होते. ते म्हणतात–'तूं संतस्तवनीं रतसी। तरी कथेची से न करिसी। कीं निराळीं बोल देखसी। सनागर ॥' (ज्ञा. ५-१४१). 'तूं गीतेचें जें व्याख्यान करतोस तें तर नागर आहेच, परंतु जें संतांचें वर्णन करतोस तें तर 'सनागर' म्ह० 'अतिउत्कृष्ट असें आहे.' एऱ्हवीं ज्ञा० म० अगदीं काटेकोरपणानें लिहिणारे ('तैसें जी न बडबडीं। पदाची कोर न सांडीं। ज्ञा. १३-८५३), परंतु ते एकदां संताचें वर्णन करावयास लागले म्हणजे त्यांचेंच त्यांना आवरत नाहींसें होतें. कारण संत जरी झाला तरी साधा प्रकृतिधर्म हा असतोच. गीतेच्याच शब्दांत सांगावयाचें तर–'सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि' (गीता ३-३३) मोठ-

मोठ्यांनाहि आपल्या प्रकृतिधर्माचें उल्लंघन करणें कठीण जातें. ज्याचा जो आवडीचा विषय असतो तो प्राप्त झाला म्हणजे तो त्यांत रममाण होणारच व थोडेंसें अधिक बोलणारच. माणसें जेवावयास बसलीं असतां ज्याचें जें आवडतें पक्वान्न असतें, तें पानांत वाढलें गेलें असतां तो त्यावर ताव मारणारच. उदाहरणार्थ, एखादा मनुष्य नुकताच आजारीपणांतून उठलेला असतो. त्याचा डॉक्टर त्याला बजावून सांगत असतो कीं, 'हे पहा! उद्यां सणाचा दिवस आहे. तुमच्या घरीं पक्वान्नें करतील तर त्याला तुम्ही हातहि लावूं नका.' परंतु तो मनुष्य जर पक्वान्नाचा भोक्ता असला व त्याची व डॉक्टरची थोडीशी घसट असली तर तो त्याला विनोदानें म्हणतो, "तुम्ही सांगतां त्याप्रमाणें मी पक्वान्नाला हातानें स्पर्श करणार नाहीं. परंतु चमच्यानें थोडेंसें घशांत टाकावयास काय हरकत आहे." त्यावर डॉक्टर म्हणतो, 'मेहेरबानी करून तसें कांहीं करूं नका.' इतकें बजाविलें असतांहि तो दुसऱ्या दिवशीं पानावर जेवावयास बसतो व पक्वान्नावर ताव मारतोच. तद्वतच ज्ञा० म० संतांचें वर्णन करूं लागले कीं, ते त्यांत रममाण होतातच. त्यांचें शेवटचें पसायदानच पहा! ते म्हणतात—'वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूतळीं। भेटो तया भूतां।।' (ज्ञा. १८-१७९६). एवढेंच सांगून ज्ञानेश्वरमहाराज थांबत नाहींत. त्याच्यापुढें दोनतीन ओंव्या ते अधिक लिहितातच, ('चला कल्पतरूंचे अरव। चेतनाचिंतामणींचे गांव। बोलते जे अर्णव। पीयूषाचे।। चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु।।' ज्ञा. १८-१७९६-९७). तद्वतच 'अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम्। आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः।।' (गीता-१३-७) या श्लोकांतील 'आचार्योपास्ति' या पदाचें व्याख्यान करतांना ज्ञानेश्वरमहाराजांनीं गीतेंतील इतर कोणत्याहि श्लोकांतील पदावर जें व्याख्यान केलें आहे, त्यापेक्षां

या पदावर त्यांनीं शें-दीडशें ओंव्या अधिक लिहिल्या आहेत. ह्याचें कारण एकच व तें म्हणजे ज्ञानेश्वरमहाराज एकदा संताचें वर्णन करूं लागले कीं, ते त्यांत तन्मय होतातच. 'गुरुसेवेविषयीं माझा जीव अत्यंत अभिलाषी आहे व म्हणूनच मी एवढें पाल्हाळिक व्याख्यान केलें' असें त्यांनीं या बाबतींत म्हटलें आहे. ('जिये गुरुसेवेविखीं। माझा जीव आभिलाखी। म्हणोनि सोय चुकी। बोली केली॥' ज्ञा. १३–४५५). एवढ्याकरितांच श्रोते त्यांना म्हणतात--'तूं संतस्तवनीं रतसी। तरी कथेची से न करिसी। कीं निराळीं बोल देखसी। सनागर॥' (ज्ञा. ५–१४१) म्हणजे 'तूं संताच्या स्तवनांत रममाण झालास कीं, तुझें कथासूत्राचें अवधान सुटतें. म्हणजे गीतेचें व्याख्यान बाजूलाच राहातें.' ह्याचा अर्थ तूं वाटेल तें बडबडतोस असें मात्र नव्हे. मनुष्याची शुद्धि गांजा पिऊन नष्ट झाली असतां तो बेहोष होतो व मग तो वाटेल तें बडबडूं लागतो. त्याप्रमाणें ज्ञानेश्वरमहाराजांचें व्याख्यान नव्हे. तूं संतस्तवनामध्यें भुलून जातोस पण त्याचा परिणाम फार निराळा होतो. गांजा ओढून होणारी बडबड निराळी व संत-स्तवनामध्यें येणाऱ्या उन्मादामुळें जे शब्द बाहेर पडतात ते फार निराळे. म्हणूनच, 'निराळीं बोल देखसी सनागर' असें म्हटलें आहे म्हणजे वेगळें बोलतोस पण अति उत्कृष्ट, जसें मधाचे थेंब तोंडांत पडावेत तसे हे तुझे बोल अति गोड आहेत. याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं, 'ज्ञानोबा, तुझें एकदां संतवर्णनपर व्याख्यान सुरू झालें कीं, तें इतकें रसाळ, विदग्ध व अभिजात असतें कीं, त्यांत तोंड घालून तुला थांबवावयाचें आमच्या अगदीं जीवावर येतें. कारण त्यांतील प्रत्येक शब्द हा अमृतापेक्षांहि गोड असतो.' कल्पना करा, एखादी जेवण्याची पंगत अगदीं रंगांत आलेली आहे, विद्वान, गुणी व प्रेमाची मंडळी जेवावयास बसली आहेत, आग्रह जोराचा चालूं आहे, अशा वेळीं उदार मालकाला 'आटपा लवकर, मागून अजून दुसरी पंगत जेवावयास बसावयाची आहे' असें सांगून पक्वान्नाची वाढप रोखण्याचा प्रसंग

आला म्हणजे तें जसें त्याच्या अगदीं जीवावर येतें; त्याप्रमाणें ज्ञानेश्वरमहाराजांचें संतस्तवन चालूं असतां श्रोत्यांना त्यांना अडविणें कठीण वाटे, हीच गोष्ट 'निराळीं बोल देखसी सनागर' या त्यांच्या उद्‌गारावरून स्पष्ट होणारी आहे. वरील उद्‌धृत केलेली ओवी ही ज्ञानेश्वरमहाराजांच्या सनागर अशा संतस्तवना-पैकीं एक असल्यामुळें ती अत्यंत उत्कृष्ट अशीच आहे.

ज्ञानेश्वरमहाराज या नमनांत आपल्या गुरूंचें महात्म्य वर्णन करून नंतर ते त्यांच्याजवळ आशीर्वाद मागतात, 'म्हणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापीं मातें । ग्रंथनिरूपणीं ॥' (ज्ञा. १२–१०). ज्ञानेश्वरमहाराजांचे गुरु फार थोर अधिकाराचे होते. वाटेल त्याला मोक्ष देण्यांत ते जसे श्रीमंत होते ('कैवल्य-कनकाचिया दाना । जो न कडसी थोरसाना । द्रष्ट्याचिया दर्शना । पाढाउ जो ॥' अमृ. २–५). त्याचप्रमाणें दुसऱ्यास सारस्वत देण्याचीहि त्यांची योग्यता होती ('तुमचा अनुग्रह-गणेशु । जैं दे आपुला सौरसु । तैं सारस्वतीं प्रवेशु । बालकाहि आथि ॥' ज्ञा. १०–६; 'हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।" ज्ञा. ११–१९; 'म्हणोनि साधका तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं ॥' ज्ञा. १२–८). ह्या गोष्टी करण्याकरितां त्यांना कांहींहि कष्ट करावे लागत नाहींत. त्यांच्या नुसत्या आशीर्वादानें सर्व कांहीं होतें. ("तुका म्हणे ते आशीर्वादें बळी ।" तुका० ३०६९). त्यांचें एवढें सामर्थ्य असतें कीं, त्यांनीं नुसतें 'सांग' किंवा 'होईल' एवढें म्हटलें म्हणजे पुरें होतें. किंवा त्यांनीं दृष्टिक्षेप टाकला तरी शिष्याचा सर्व कार्यभाग होतो. श्रीमच्छंकराचार्यांनीं तोटकावर कृपा केली तर तो तोटकाचार्य झाला; एकनाथांनीं गावबाच्या मस्तकावर हात ठेवला तर त्यांनीं त्याला भावार्थ रामायणाचें उत्तरकांड लिहिण्यास समर्थ केलें व ज्ञानेश्वरमहाराजांनीं रेड्यास नुसती आज्ञा केली तर तो वेद बोलूं लागला. ('म्हैसीपुत्रा मुखें बोलावणें श्रुती ।' निळा). नाहींतर कांहीं माणसें अशीं भाग्य-

वान् असतात कीं, ते म्हणतात, "आम्ही मोटारींत बसलों आहोंत ना, मग ती मोटार बंद पडलीच पाहिजे· ती वेळेवर पोहोंचणारच नाहीं." "अमक्याला केस दिली कीं ती विरुद्ध (fail) होणारच !" परंतु संत हे ह्याच्या अगदीं विरुद्ध टोकावरचे होत. त्यांनीं नुसतें 'व्याख्यान चालूं दे' एवढें म्हटलें म्हणजे पुरें होतें. ('म्हणे गीतार्थेंसी उठीं । न बोलें बहु ।' ज्ञा० १२–१८). असा आशीर्वाद मिळाला म्हणजे ज्ञानेश्वरमहाराजांना परम संतोष होतो आणि अशा संतोषांतच ते आपल्या व्याख्यानास सुरवात करतात ('तेथ जी जी महाप्रसाद । म्हणोनि साविया जाइला आनंद । आतां निरोपीन प्रबंध । अवधान दीजे ॥' ज्ञा० १२–१९). म्हणूनच त्यांचें व्याख्यान तत्त्वज्ञान, अनुभव व काव्य इत्यादि सर्व गोष्टींनीं परिपूर्ण असतें.

कांहीं टीकाकारांचें असें म्हणणें आहे कीं, ज्ञानेश्वरमहाराजांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ, पहिलाच ग्रंथ असल्यामुळें त्यांनीं तो अपरिपक्व अवस्थेंत लिहिला व म्हणून तो कमी प्रतीचा आहे. तो कच्च्या करपलेल्या भाकरीप्रमाणें आहे व तो बायाबापड्यांनीं वाचण्यास योग्य आहे. शिवाय ज्ञानेश्वरी ही गीतेवरील नुसती एक टीका आहे. ह्याच्या उलट अमृतानुभव हा ज्ञानेश्वरमहाराजांचा स्वतंत्र व शास्त्रीय ग्रंथ आहे व तो त्यांनीं आपल्या परिपक्व अवस्थेंत लिहिलेला असल्यामुळें तोच यथार्थ आहे. परंतु हें त्यांचें म्हणणें वास्तव नाहीं. आणखी 'बायाबापड्या' हे शब्द योजून आपण स्त्रीवर्गाची काय निंदा करतों हेंहि त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ज्ञानेश्वरमहाराज हे अनुभवदृष्ट्या जन्मतःच परिपूर्ण होते. पहिल्यांदा ते अपरिपक्व होते आणि मागाहून परिपूर्ण झाले अशांतला कांहीं भाग नाहीं. 'तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥' (ज्ञा० ६–४५३), असें ते जन्मतःच सिद्धप्रज्ञ होते.

अपरिपक्व अवस्थेंत मनुष्यानें कांहीं लिहिलें अथवा बोललें

१०९८२

म्हणजे मागाहून त्याला ही माझी हिमालयाएवढी घोडचूक झाली असें म्हणण्याचा प्रसंग येतो. परंतु ज्ञानेश्वरमहाराजांच्या बाबतींत तशी कांहीं स्थिति नव्हती. ते ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या प्रारंभींच म्हणतात—'कां चिंतामणी आलिया हातीं । सदा विजयवृत्ति मनोरथीं । तैसा पूर्णकाम श्रीनिवृत्ती । ज्ञानदेव म्हणे ॥' ज्ञा० १–२४; म्हणूनच त्यांच्या ग्रंथांना आज जरी ६५० पेक्षां अधिक वर्षे होऊन गेलीं आहेत, तरी त्यांचें प्रामाण्य आजहि कायम आहे. संत हे पूर्णकाम असल्यामुळें ते जें लिहितात त्याला जरी शेकडों वर्षें लोटलीं तरी तें प्रमाणभूतच राहतें. त्यांत काडीचाहि फरक करावा लागत नाहीं. तें लिखाण म्हणजे अपरिपक्व स्थितींतील 'Experiments with truth' नव्हे. हें लिखाणच निराळें. त्यांतून काय निर्माण होईल हें भगवंतच जाणे! संत हे प्रथमतः सद्रूप होतात आणि मग लिहितात म्हणून त्यांचे ग्रंथ सर्वदा प्रमाणभूतच राहतात. एवढेंच नव्हे, तर त्यांचे बिसाट शब्द जरी असले तरी ते सुद्धां निश्चितपणें खरेंच ठरतात ('तयाचे बिसाट शब्द । सुखें म्हणों येती वेद ॥' ज्ञा० १८–१६४५).

कै. प्रो. गुरुदेव रामभाऊ रानडे यांचें गुरुजी उमदीकरमहाराज म्हणून होते. त्यांच्या दर्शनाला एक वृद्ध स्त्री आली असतांना तिला ते 'तुला मुलगा होईल' असें म्हणाले. बाई वृद्ध असल्या-मुळें मूल होण्याचें वय टळून गेलें होतें. रामभाऊ मोठे तार्किक व असामान्य बुद्धीचे गृहस्थ. त्यांनीं लगेच आपल्या गुरुजींना विचारलें कीं, 'तुम्हीं त्या वृद्ध बाईला मुलगा होईल असें सहज बोलून गेलात, पण तें कसें शक्य आहे?' त्यावर त्यांचे गुरुजी म्हणाले, "अरे! आम्हीं जन्मांत कधीं खोटें बोललोंच नाहीं. म्हणून जरी यदाकदाचित् आमच्या मुखांतून एखादे वेळीं निसर्गाच्या विरुद्ध शब्द निघून गेला तर देवाला तो खरा करावाच लागतो." दुसऱ्या वर्षी ती बाई जी महाराजांच्या दर्शनाला आली, ती कडेवर मूलच घेऊन आली. तपश्चर्येचें हें

सामर्थ्य आहे. त्यांनीं 'हो म्हटलें' कीं तें होणारच. त्यांचा विसाट शब्द जर इतका सामर्थ्यवान असतो तर, त्यांनीं आपणहून आशीर्वाद दिला तर तो खोटा कसा ठरेल? ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ हे निवृत्तिनाथांच्या आशीर्वादाचें फल होत व शिवाय ते पूर्ण-काम होऊन लिहिलेले असल्यामुळें ते अमृतापेक्षांहि गोड आहेत. त्यांत न्यून असें कांहींच नाहीं. म्हणूनच नामदेवराय ज्ञानेश्वरीचें वर्णन करतांना म्हणतात—'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी ॥' सामान्यतः ग्रंथकार आपल्या ग्रंथाकडे बोट दाखवून म्हणत असतो, 'ह्याच्यामधील आमचें हें अमूक बघा.' परंतु ज्ञानेश्वरीच्या बाबतींत 'सर्वच बघा' असें आहे. केळें जसें सोलून खातात म्ह० त्याचें साल काढून टाकून देतात त्याप्रमाणें पेढा हा कांहीं सोलून खात नाहींत. तो कोणत्याहि बाजूनें खाल्ला तरी तो गोडच असतो. तसाच ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अथपासून इति-पर्यंत परिपूर्ण व गोडच आहे. प्रकाशमय दिवा जसा कोणत्याहि बाजूनें पाहिला तरी तो प्रकाशमयच असतो तसा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. प्लेटोचे Dialogues सुंदर आहेत. परंतु त्याच्यांत कांहीं पूर्वींचे व कांहीं मागचे (Earlier and Later) अशी प्रतवारी लाविलेली आहे. परंतु संतांच्या बुद्धीची पातळी शेवटपर्यंत कायमच राहाते. त्यांच्या वाङ्मयांत हें प्रारंभींचें व हें मागचें अशी निवड करावी लागत नाहीं. ज्ञा०म० नीं जसें गीतेच्या श्लोकांच्या बाबतींत म्हटलें आहे,-- 'तैसे पहिले सरते। श्लोक न म्हणावे गीते। जुनीं नवीं पारिजातें। आहाती काई ॥' ज्ञा. १८-१६८०) त्याचप्रमाणें संताची पहिली ओवी व शेवटची ओवी सारखीच असते. त्यांच्या सर्वच ओव्या मौल्यवान् असतात. आतां आपण ओवीच्या अंतर्भागाकडे वळूं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २०५५ वि. ...
क्रमांक १२२२ नों. दि. २०।३।६०

जयजय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे ।
अनवरत आनंदें । वर्षतिये ॥

★

या ओवींत ज्ञानेश्वरमहाराज प्रथमतः आपल्या गुरूंचें आध्यात्मिक स्वरूप सांगून नंतर ते काय देतात तें सांगतात. या ओवीचा थोडक्यांत भावार्थ असा आहे–"हे गुरुकृपा-दृष्टिरूपी माउली म्ह० हे गुरुमाउली, 'तूं जयजय' म्ह० 'तुझा जयजयकार असो.' तूं कशी आहेस ? तर 'शुद्ध' म्ह० निर्मल अथवा पवित्र आहेस. आणखी तूं कशी आहेस ? 'प्रसिद्धे उदारे' म्ह० 'सुप्रसिद्ध दानशूर' आहेस. म्हणजे तुझी दातृत्वाबद्दल फार ख्याति आहे. आणखी तूं काय करतेस ? तर 'अनवरत आनंदें । वर्षतिये ॥' म्ह० अखंड आनंदाचा वर्षाव करणारी आहेस."

या ओवीमध्यें ज्ञानेश्वरमहाराजांनीं जीं विशेषणें योजिलेलीं आहेत, तीं अत्यंत महत्त्वाचीं आहेत व तींहि त्यांनीं विशिष्ट पद्धतीनें योजिलेलीं आहेत. वकील हा ज्याप्रमाणें कोर्टासमोर आपले मुद्दे विशिष्ट क्रमानें मांडीत असतो, त्याचप्रमाणें या विशेषणांमध्यें एकसूत्रीपणा आहे. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'हे श्रीगुरुमाउली ! तूं आंत-बाहेर शुद्ध आहेस. तेव्हां 'शुद्ध' हें विशेषण पहिलें आहे व त्यांत ते आपल्या गुरूंचें आध्यात्मिक स्वरूप सांगतात. परंतु नुसती शुद्धता असून काय उपयोगाची ? ती दुसऱ्यास देण्याकरितां अंगांत औदार्य असावें लागतें. एवढ्या-करितां 'प्रसिद्धे उदारे' हें दुसरें विशेषण योजलें आहे. परंतु ही उदारता कोणत्या प्रकारची आहे, ही गोष्ट तिसऱ्या विशेषणानें सांगितली आहे— 'अनवरत आनंदें । वर्षातिये ॥' म्ह० तूं अखंड आनंदाचा वर्षाव करणारी आहेस. ह्याचा थोडक्यांत अर्थ

असा कीं, तूं साधकाला आपली शुद्धता देतेस व त्याला आनंदरूप करून टाकतेस.

प्रस्तुत ओवींतील 'शुद्ध' हा शब्द वेदान्त शास्त्रांतील एक सांकेतिक शब्द आहे. सामान्यतः प्रत्येक ग्रंथकर्त्यांचे कांहीं विशिष्ट संकेत असतात. तेव्हां त्याचा ग्रंथ वाचण्यापूर्वी त्या सांकेतिक शब्दांचे विशिष्ट अर्थ प्रथमतः समजून घ्यावे लागतात. तद्विरहित त्याचा ग्रंथ किती वेळां जरी वाचला तरी तो यथार्थपणें समजणार नाहीं. उदाहरणार्थ, तुकाराममहाराजांचा 'देव पहाहो देव पहाहो । उंच ठायीं उभे राहो ॥' हा एक सुप्रसिद्ध अभंग आहे. ह्यांत 'उंच ठायीं' ह्या शब्दांचा काय अर्थ आहे, हें तुकाराममहाराजांच्या वाङ्मयाचा व त्यांच्या सांकेतिक परिभाषेचा परिचय असल्याखेरीज समजणार नाहीं. नुसता कोश घेऊन बघितलें तर त्यांत 'उंच ठायीं' या शब्दांचा अर्थ 'उंच ठिकाणीं' असा निघेल व याप्रमाणें वरील कडव्याचा अर्थ 'देव पाहाण्याकरितां उंच ठिकाणीं उभें राहावें' असा होईल. म्हणजे पर्वतीच्या टेकडीवर उभें राहिलें असतां किंवा मुंबईच्या राजाभाई टॉवरवर उभें राहिलें असतां अथवा भारतांतील जो उच्चतम पर्वत हिमालय त्याच्या शिखरावर उभें राहिले असतां देव दिसतो, असा ह्या कडव्याचा अर्थ होईल. परंतु तसा ह्या कडव्याचा अर्थ नाहीं. हिमालयासारख्या उंच पर्वताच्या शिखरावर उभें राहिलें असतां फार तर एखादा हिमपुरुष दिसेल, परंतु देव दिसणार नाहीं. कोणत्या उंचीवर गेलें असतां देव दिसतो, ही गोष्ट एखादा त्यांतील अनुभवी सत्पुरुष भेटला तरच कळेल. ज्ञानेश्वरमहाराजांनीं देव दिसण्याकरितां कोणत्या उंचीवर जावयास पाहिजे हें एका ओवींतच सांगितलें आहे. ती ओवी अशी आहे— 'प्रवर्तलाही वेगीं बहुडे । देह सांडूनि मागिलीकडे । महाभूतांचिया चढे । माथयावरी ॥' (ज्ञा. १०-७३).

तेव्हां 'शुद्ध' हा जो शब्द ज्ञानेश्वरमहाराजांनीं प्रस्तुत ओवींत योजलेला आहे, त्याचा संपूर्ण अर्थ नुसता कोश पाहून कळणार

नाहीं. कोशांत शुद्ध या शब्दाचा अर्थ नुसता 'पवित्र' असा निघेल. परंतु 'पवित्र' म्हणजे तरी काय? हें समजण्याकरितां ज्ञानेश्वरमहाराजांनीं या १२ व्या अध्यायांतील 'अनपेक्षः शुचिर्दक्षः' (गीता–१२–१६) या श्लोकांतील शुचि या पदाचें जें व्याख्यान केलें आहे तें पाहावें लागेल. ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरींत 'शुचि' या पदाचें व्याख्यान फलतः व स्वरूपतः अशा दोन्ही दृष्टींनीं केलें आहे.

सामान्यतः तीच वस्तु 'शुद्ध म्ह० पवित्र' म्हणून गणली जाते, कीं जिच्याजवळ दुसरी अपवित्र वस्तु आली असतां ती तिच्यामुळें अपवित्र तर होत नाहींच पण उलट त्या अपवित्र वस्तूला ती पवित्र करते. संत हे असे शुद्ध आहेत. कारण त्यांच्याजवळ अपवित्र लोक आले असतां ते शुद्ध होतात ('पुनीत केलें विष्णुदासी। संगें आपुलिया दोषी ॥' तुका०–१९८९).

भारतांत मुख्यतः तीन वस्तु मोठ्या पवित्र गणल्या आहेत. एक काशीक्षेत्र, दुसरा हिमालय व तिसरी गंगा. परंतु या तिहींपेक्षा संतांचें पावित्र्य अगाध आहे. काशी ही मोक्ष देण्यांत उदार आहे ही गोष्ट खरी, परंतु जो काशींत मरेल त्यालाच ती मोक्ष देऊं शकते ('मोक्ष देऊनि उदार। काशी होय कीर। परि वेंचणें लागे शरीर। तिये गांवीं ॥' ज्ञा० १२–१७३). मरणाच्या वेळेस काशींत काशीविश्वेश्वर मरणाऱ्याच्या कानांत 'तारकमंत्राचा' उपदेश करतात व मेल्यानंतर तो मनुष्य मुक्त होतो ('मरणमुक्ति वाराणसी।' तुका० २३९८). जन्मभर जरी मनुष्य काशींत राहिला, परंतु मरणाच्या वेळेस तो जर काशीच्या बाहेर येऊन मेला तर त्याला काशी मोक्ष देऊं शकत नाहीं. पण मुक्त होण्याकरितां संतांच्या जवळ येऊन मरावें लागत नाहीं व त्यांच्याजवळ कायमचें येऊन राहावेंहि लागत नाहीं. संतांना नुसतें आलिंगन देण्यांत मोक्ष प्राप्त होतो ('आलिंगनें घडे। मोक्ष सायुज्यता जोडे।' तुका०–१९३४). आलिंगन देणें म्हणजे संतांच्या बोधांत समरस होणें.

हिमालय हाहि पवित्र आहे परंतु हिमालयाची यात्रा करण्याकरितां शरीर सुदृढ असावें लागतें, जवळ पैसा लागतो व यात्रा करतांना जीवास अपायहि होण्याचा संभव असतो. हिमालयाच्या पाण्यांत वाळू असते व तें जर गाळून प्यालें नाहीं तर त्यापासून शरीराला पीडा होण्याचा संभव असतो ( 'केदारीचें उदकपान । करी पीडन देहासी । ' नामा.–९७३ ). शिवाय मोक्ष मिळण्याकरितां हिमालयावर देह पडावा लागतो म्हणूनच भगवंतांनीं उद्धव व विदुर यांस आपला विग्रह सोडण्यकरितां हिमालयावर जाण्यास सांगितलें. तसेंच आद्य शंकराचार्य व पांडव यांनीं आपले देह हिमालयावरच ठेवले आहेत. परंतु संतांच्याजवळ येण्यास कष्ट करावे लागत नाहींत, पैसा खर्च करावा लागत नाहीं व मोक्ष मिळविण्याकरितां त्यांच्याजवळ देहहि पडावा लागत नाहीं ( 'हिमवंतु दोष खाये । परि जीविताची हानि होये । तैसें शुचित्व नोहे । सज्जनाचें ॥ ' ज्ञा० १२–१७४ ).

गंगा हीहि पवित्र आहे. गंगेचें पाणी खोल असतें. त्या पाण्याला फार ओढ असते व म्हणून त्यांत बुडी मारण्यास गेलें असतां बुडण्याचा संभव असतो. एवढ्याकरितां गंगेंत साखळदंडाला धरून बुडी मारावी लागते ( 'शुचित्वें शुचि गंगा होये । आणि पापतापहि जाये । परि तेथें आहे । बुडणें एक ॥' ज्ञा०–१२–१७५ ). तसेंच गंगेंत स्नान करण्याकरितां श्रद्धा असावी लागते. नाहींतर परदेशचे लोक गंगेंत येऊन स्नान करतात, परंतु त्यांना गंगास्नानाचें पुण्य लाभत नाहीं. ज्याची श्रद्धा असेल त्यालाच गंगास्नानाचें पुण्य लाभतें. शिवाय गंगास्नान हें 'अदृष्टफलसूचक ' आहे. म्हणजे मेल्यानंतर उत्तम गति प्राप्त करून देणारें आहे. परंतु संतसंगति ही 'दृष्टफलसूचक ' आहे. म्हणजे याच जन्मांत मोक्ष देणारी आहे ( 'याचि देहीं याच डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा ॥ ' आनंदलहरी १२५; 'धर्म जागो गुरुमहिमा । देहीं दाविला देव ॥ ' नाथ०–३७१३ .)

शिवाय गंगेंत पापी लोक स्नान करतात, त्यामुळें गंगेला जो अपवित्रपणा येतो, तो संतांनीं तिच्यांत स्नान केलें असतां नाहींसा होतो. अशी एक कथा आहे कीं, पुंडलीकराय आपल्या आई-बापांना घेऊन यात्रा करीत असतांना त्यांचा मुक्काम कुक्कुट-स्वामींच्या आश्रमांत पडला. त्या वेळेस त्यांना दररोज पहांटे तीन मलिन स्त्रिया स्वामींचा मठ झाडीत असतांना दिसत. झाडून झाल्यानंतर त्या स्फटिकासारख्या शुभ्र व सुंदर होऊन परत जात. एकदां त्यांनीं त्यांना विचारलें कीं, 'आपण कोण आहांत?' त्या वेळीं त्यांनीं सांगितलें कीं, 'आम्ही गंगा, यमुना व सरस्वती अशा तीन नद्या आहोंत; आमच्यांत पापी लोक स्नान करतात, त्यामुळें आम्ही मलिन होतों व स्वामींचा मठ झाडल्यानें त्या पापांतून मुक्त होऊन पुन्हां शुभ्र व स्वच्छ होतों.' तात्पर्य, खुद्द गंगेचें पातक संतांच्या अंगस्पर्शानें नाहींसें होतें ('संताचेनि अंगलगें । पापातें जिणणें गंगे । तेणें संतसंगें । शुचित्व कैसें ॥' ज्ञा० १२-१७७). म्हणून संत हे तीर्थांनाहि तीर्थ होतात ('तीर्थी कुर्वन्ति तीर्थानि ।' नारदभक्तिसूत्र ६९), एवढी त्यांची पवित्रता असते ('तीर्थें तया ठाया । येती पुनीत व्हावया । पर्वकाळ पायांतळीं बसे वैष्णवां ॥' तुका० २०८१). संत हे चिद्गंगा आहेत कीं जिचें दर्शन होतांच ती संसाराचा उच्छेद करते. म्हणून लौकिक गंगा किंवा इतर भौम तीर्थें यांपेक्षां संतांचें पावित्र्य अधिक ठरतें ('तुमची दर्शनसंग चिद्गंगा । अत्यंत दाटुगी माजीं जगा । दर्शनमात्रें ने भवभंगा । जन्ममरणें पैं गा मग कैचें ॥' ए० भा० २-२५१).

आतां गंगेच्या ठिकाणीं जें पावित्र्य आलें आहे तें भगवंतांच्या चरणस्पर्शामुळें होय. कारण गंगा ही भगवंतांच्या चरणांगुष्ठापासून निघाली आहे. ('गांगं वारि मनोहारि मुरारिचरणच्युतम् । त्रिपुरारिशिरश्चारि पापहारि पुनातु माम् ॥' शंकराचार्य). परंतु तो भगवानहि प्रत्यक्ष संतांच्या संगतीचीच अपेक्षा करतो व त्यांच्या चरणरेणूनें आपण पवित्र झालों असें मानतो ('अनुव्रजा-

म्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः । ' ए० भा० श्लोक-१४-१६; ' देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ॥ ' तुका० १९८५. ).

एकदां नारद फिरत फिरत सहजगत्या सत्यभामेच्या मंदिरांत आले. सत्यभामा हें भगवंताचें अगदीं भोळें कुटुंब. तिनें नारदांना विचारलें कीं, 'नारदा ! मला श्रीकृष्ण पति जन्मोजन्मीं मिळावा असें वाटतें, याला काय उपाय आहे ?' तेव्हां नारद म्हणाले कीं, ' ज्याप्रमाणें वैद्यकशास्त्रांत असा रोग नाहीं कीं ज्याला औषध नाहीं, त्याप्रमाणें धर्मशास्त्रांतहि अशी गोष्ट नाहीं कीं जिला उपाय नाहीं. आपण या जन्मांत जी वस्तु दान करतों, तीच आपल्याला पुढच्या जन्मांत प्राप्त होत असते. तेव्हां तूं भगवंताला जर दान देशील, तर तो तुला पति म्हणून पुढच्या जन्मांत प्राप्त होईल. ' सत्यभामा म्हणाली, " पण नारदा ! ह्यांना दान कोण घेणार ? आपण व्यवहारांत पाहतों कीं, हत्तीला दान घेण्यास, घेणारा मनुष्य समर्थ असावा लागतो, मग भगवंताला दान घेणारा मनुष्य केवढा समर्थ असावयास पाहिजे !" नारद म्हणाले, " त्याची तुला काळजी नको, मी त्याला दान घ्यावयास तयार आहे." नंतर सत्यभामेनें नारदाच्या हातावर भगवंताचें उदक सोडलें. नारद तसाच ओला हात घेऊन भगवंतांच्या दरबारांत गेले. भगवंतांनीं त्यांना नेहमींप्रमाणें उत्थापन दिलें. त्याबरोबर नारद म्हणाले कीं, 'आतां तुमचें आमचें नातें बदललें आहे; इतके दिवस तुम्ही जगन्नाथ होतां, परंतु आतां मी मालक झालों आहें व आपण सेवक झाला आहांत. हा पहा माझा ओला हात. आतांच मी आपलें दान सत्यभामेकडून घेऊन आलों आहे." वास्तविक व्यवहारांत कन्यादान असतें. परंतु दान दिलेली वस्तु ज्याला दान केलेली असते, त्याचें दान करूं शकत नाहीं. परंतु भगवंतांनीं कांहींहि कुरकुर केली नाहीं. कारण त्यांना नारदाची सेवा अपेक्षितच होती. ते म्हणाले, " नारदा ! मी तुझी सेवा काय करूं ? हा तुझा तंबोरा घेऊं ? " नारद म्हणाले, " हें तर आमचें

भांडवल ! ह्याच्यावरच तर आम्हीं तुला जिंकलें. या माझ्या पायांतील ज्या खडावा आहेत, त्या तूं घे. " त्यावेळीं वर्तमानपत्रें होतीं किंवा नाहीं, कोणास ठाऊक, परंतु अलीकडचा मनुष्य जर असतां तर त्यानें त्या खडावा वर्तमानपत्रांत गुंडाळून फार तर त्या आपल्या बगलेंत घेतल्या असत्या. परंतु भगवंतांनीं हुंचूं न करतां त्या खडावा आपल्या मस्तकावर धारण केल्या व ते नारदाच्या मागें चालूं लागले ('सत्यभामा दान करी । उजुर नाहीं अंगीकारी । सेवकाच्या शिरीं । धरूनी चाले पादुका ॥ ' तुका-४५४ ). तात्पर्य, संत हे भगवंतापेक्षांहि अधिक पवित्र ठरतात ( ' तुका म्हणे आम्ही देवाहूनि बळी । जाहलों निराळी ठेवूनि आशा ॥ ' तुका-२०२१) भगवंत स्वतः सांगतात-'माझ्या ठायीं जें पवित्रपण । तें भक्तांचेनि मज जाण । यालागीं भक्तामागें मी आपण । धांवें चरणरेणू वंदावया ॥ भक्तचरणरेणु वंदितां । मज केवढी आली पवित्रता । माझे पायवणी वाहे माथां । जाण तत्त्वतां सदाशिवू ॥ ' ( ए० भा.-१४-१८९-९० ).

इतकें पावित्र्य अंगांत येण्यास संत हे किती पवित्र झालेले असतात, याची कल्पना येणें अवश्य आहे. एवढ्याकरितांच ज्ञा० म० नीं शुद्ध ' हा शब्द योजलेला आहे. याच अर्थी ज्ञा० म० नीं ' निर्मल ' हाहि शब्द ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायाच्या प्रारंभींच्या नमनांत योजलेला आहे ( ' जयजय देव निर्मळ । निजजनाखिलमंगळ । जन्मजराजलदजाल-। प्रभंजन ॥' ज्ञा०-१८-१ ) तेव्हां ' शुद्ध ' अथवा ' निर्मल ' या शब्दांचा अर्थ केवळ ' पवित्र' एवढाच मर्यादित नसून या शब्दांना वेदांत-शास्त्रांत विवक्षित असा अर्थ आहे. केवळ ' निर्धर्म म्ह० निरुपाधिक ' अशी जी ' स्वरूपस्थिति म्ह० ब्रह्मस्थिति ' ती शुद्ध अथवा निर्मल या शब्दांनीं संबोधिली जाते. तेव्हां शुद्ध ह्या शब्दाचा अर्थ 'निरुपाधिक ब्रह्म' असा आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीं शुद्ध हा शब्द याच अर्थी योजलेला आहे ( ' पैं विश्व घेऊनि

गेला मार्गेसीं । तया चोरातें कवण कें गिवसी । जे कोणी एकी दशा ऐसी । शुद्ध ते मी ॥' ज्ञा०–१५–४४१ ).

मनुष्याच्या ठिकाणीं अपवित्रता त्याच्या ठिकाणच्या देहतादात्म्यामुळें मुख्यतः आलेली असते. 'देहोऽहम्' हें स्फुरण घालविण्याकरितां 'शिवोऽहम्' हें स्फुरण ध्यानानें आणावें लागतें. परंतु कांहीं कालानंतर 'शिवोऽहम्' हेंहि स्फुरण जावें लागतें. शरीराच्या दृष्टीनें ज्याप्रमाणें माती हा मळ आहे त्याचप्रमाणें अत्तर हाहि मळच आहे. कारण तेंहि विजातीय द्रव्य आहे. तद्वतच 'स्वरूपाच्या दृष्टीनें' 'मी देह आहें' हें स्फुरण अविद्येचा मळ आहे व 'मी ब्रह्म आहें' हें स्फुरण विद्येचा मळ आहे ('ब्रह्मीं स्फुरे जें स्फुरण । शुद्ध सत्त्वाचें लक्षण । तो तूं लक्षी लक्ष्यातीत । परिपूर्ण रे ॥' नाथ–३१४४. 'ब्रह्माहमस्मि हा अभिमान । शुद्ध ब्रह्म नव्हे जाण ।' ए. भा०–१२–६०८ ). ह्या दोन्हीं स्फुरणरहित जी केवळ 'निर्धर्मस्वरूपस्थिति म्ह० ब्रह्मरूपस्थिति' तीच 'शुद्ध' या पदानें दर्शविली जाते. ब्रह्म हें उपाधिरहित होण्यास्तव तें अत्यंत शुद्ध आहे ('आत्माऽव्ययोऽगुणः शुद्धः स्वयंज्योतिरनावृतः ।' ए० भा०–२८ श्लोक ११ ) व अशा ब्रह्माशीं संत विचारानें समरस झालेले असल्यामुळें ते खरे 'शुद्ध' होत.

ही निरुपाधिक शुद्ध आत्मस्वरूपस्थिति काय प्रकारची आहे, हें शब्दांनीं सांगणें फार कठिण आहे. एवढ्याकरितां ज्ञानेश्वर-महाराजांनीं 'सर्वस्याचाहं हृदि संनिविष्टः' ( गीता०–१५–१५ ) या श्लोकावर टीका करतांना भगवंतांनीं 'या चराचरांतील आपल्या व्याप्तीचें वर्णन करतां करतां शेवटीं त्यांनीं आपल्या व्याख्यानाचें पर्यवसान निरुपाधिक अशा शुद्ध ब्रह्मस्वरूपांत केलें, असें म्हटलें आहे. कारण यापुढें व्याख्यान करणेंच अशक्य आहे ('ऐसें जडाजडव्याप्ती । रूप करितां कैवल्यपती । ठी केली निरुपाहितीं । आपुलां रूपीं ॥' ज्ञा. १५–४४२ ). परंतु या निरुपाधिक शुद्ध आत्मस्वरूपाची कल्पना येण्याकरितां ज्ञानेश्वर-

महाराजांनीं त्याच ठिकाणीं एक मोठा मार्मिक दृष्टांत दिला आहे. आपण देवासमोर कापूर लावतों म्हणजे अग्नीनें तो पेटवितों. मग काय होतें? कापूर जळतो म्ह० कापराचें मागें कांहींहि शिल्लक राहात नाहीं. (ह्याच्या उलट आपण होळी पेटविली व ती जरी जळून खाक झाली तरी तिच्यांत मागाहून एक मण तरी राख निघतेच.) शिवाय ज्या अग्नीनें कापराला जाळलें तो अग्नीहि नष्ट होतो. ('आगी लावलीया कापुरा। ना काजळी ना वैश्वानरा। उरणें नाहीं वीरा। जयापरी॥' ज्ञा० १५-४३९). रामानें रावणाला मारलें, यांत रावण मरतो पण 'राम' शिल्लक राहतो. परंतु अग्नीनें कापराला जाळण्यांत जाळणारा जो अग्नि तोहि नष्ट होतो 'आगी पोतासाचेनि मिसें। आपणपें जाळिलें जैसें। ज्ञानाज्ञाननाशें। तैसें जाहलें॥' अमृ० ४-५). तद्वतच अज्ञानाला जाळणारें ज्ञान, अज्ञानाला जाळून आपणहि नामशेष होतें. ह्याचा अर्थ मूळ अज्ञान व तत्कार्य देहतादात्म्य ह्यांची बाधा 'मी ब्रह्म आहें' या ज्ञानवृत्तीनें झाली असतां, ती ज्ञानवृत्तीहि नाहींशीं होते व शेवटीं ज्ञानाज्ञानातीत व सर्व धर्म-शून्य अशी केवळ ज्ञानमात्र 'आत्मवस्तु' शिल्लक राहते.

ती आत्मवस्तु 'नाहीं' असेंहि म्हणतां येत नाहीं व 'आहे' असें म्हणावें तर तेंहि तेथें सहन होत नाहीं ('तेवीं समूळ अविद्या खाये। तें ज्ञानही जैं बुडोनि जाये। तऱ्ही जें नाहीं कीर नोहे। आणि न साहे असणें ही॥' ज्ञा० १५-४४०). तुकाराम-महाराज जवळजवळ हीच गोष्ट 'आहे ऐसा देव वदवावी वाणी। नाहीं ऐसा मनीं अनुभवावा' या कडव्यांत सांगतात. ह्याचा अर्थ लोकांना 'देव आहे' म्हणून सांगावें व आपण मात्र मनांत 'देव नाहीं' असें समजावें असा नाहीं. तुकाराममहाराज असे लोकांना ठकविणारे नव्हते. या कडव्याचा खरा अर्थ असा आहे कीं, आपण जरी स्वतः देवरूप झालों तरी स्वतःची देव म्हणून पूजा करून घेऊं नये. श्रीशंकराचार्यहि हेंच सांगतात—'सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्। सामुद्रो हि तरंगः

कचन समुद्रो न तारंगः ॥ '. संत हे जरी अद्वैतानुभवी असतात तरी ते आपली स्वतःची पूजा देव म्हणून करवून घेत नाहींत. तात्पर्य, या निरुपाधिक आत्मस्वरूपाचें वर्णन करतांना ' तें आहेहि म्हणतां येत नाहीं व नाहींहि म्हणतां येत नाहीं ' असें जरी असलें तरी ' तें आहे ' हें मात्र निश्चित. ' आहे–नाहीं ' या दोन्ही कल्पनेच्या पलीकडचें, पण तें आहे. ' शून्य सिद्धांत बोधु । कोणी सत्ता होय सिद्धु । नसता हा अपवादु । वस्तूसी जो ॥ ' ( अमृ० ४–२७ ).

' कांहीं नाहीं ' हें तरी कोणी ठरविलें ? तें ठरविणारा कोणी-तरी शून्यतेहून भिन्न असावयास पाहिजे. कारण शून्य हें शून्याची म्हणजे अभावाची सिद्धी करूं शकत नाहीं.

शहरांत रहाणाऱ्या माणसांना प्रसंगविशेषीं कधीं खोटें बोलावें लागतें. नांवाच्या पाटीवर ' घरांत आहेत व नाहींत ' अशीं अक्षरें असतात. कांहीं महत्त्वाचें काम करावयाचें असलें म्हणजे मनुष्य घरांत काम करीत बसतो व आपल्या बाहेरच्या नांवाच्या पाटीवर ' घरांत नाहींत ' अशीं अक्षरें करून ठेवतो. ( ज्यांच्या घरीं फोन आहे, त्यांना माहीत आहे कीं, काम फार असलें व बाहेरच्या लोकांचा त्रास होऊं नये असें वाटत असलें म्हणजे मनुष्य फोनचा रिसीव्हर फोनच्या स्टँडवरून बाजूला काढून ठेवतो ). एकदां अशी मौज झाली कीं, एक गृहस्थ काम फार असल्यामुळें आपल्या नांवाच्या पाटीवर ' घरांत नाहींत ' अशीं अक्षरें करीत असतांना त्याचा एक स्नेही त्याला भेटावयास आला. त्यानें त्याला न बघितल्यासारखें करून नांवाच्या पाटीवर ' घरांत नाहींत ' अशीं अक्षरें करून ठेवलीं व आपल्या खोलींत जाऊन, आंतून कडी लावून काम करीत बसला. जो स्नेही भेटावयास आला होता तो अगदीं मूर्ख व व्यवहारशून्य होता. वास्तविक त्यानें मनांत ओळ-खावयास पाहिजे होतें कीं ज्याअर्थीं यानें आपणास प्रत्यक्ष पाहून पाटीवर ' घरांत नाहींत ' अशीं अक्षरें करून ठेवलीं व स्वतः

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
 अनुक्रम 26544 वि: निबंध 
क्रमांक 1222 नों: दि: 26/3/68

खोलींत जाऊन बसला, त्याअर्थी एक तर त्याला आपल्याला भेटण्याची इच्छा नाहीं अथवा त्यास तशी सवड नाहीं. परंतु एवढें समजण्याइतकीहि अक्कल याच्याजवळ नव्हती. हा समंजसपणा सांगून अथवा शिकवून येतोच असें मात्र नाहीं ! या मूर्खानें त्याच्या खोलीच्या दरवाजावर थाप मारली, तों दरवाजा बंद. मग यानें 'अहो भाऊसाहेब ! अहो भाऊसाहेब !' अशा हाका मारण्यास सुरवात केली. आंत जो गृहस्थ होता त्यानें विचार केला कीं, आतां आपणांस बोललें हें पाहिजे. परंतु तो मोठा विचारी व विनोदी होता. त्यानें विचार केला कीं, येथें रागावून उपयोगाचें नाहीं. मग तो आंतूनच म्हणूं लागला, 'अरे ! मी घरांत नाहीं'. त्यावर आश्चर्यचकित होऊन त्याचा स्नेही म्हणाला, "अरे ! तुझें असें कसें रे ! तूं प्रत्यक्ष घरांत असून 'मी नाहीं' असें कसें म्हणतोस ?" त्यावर तो आंतील गृहस्थ म्हणाला, "अरे ! तुझेंतरी असें कसें रे ! तूं तर माझा स्नेही. माझ्या नोकरानें तुला 'मी घरांत नाहीं,' असें सांगितलें म्हणजे तूं त्याच्यावर विश्वास ठेवतोस आणि मी तुझा स्नेही तुला प्रत्यक्ष सांगत आहे कीं, 'मी घरांत नाहीं' त्यावर तूं विश्वास ठेवीत नाहींस, याला काय म्हणावें ? निदान माझ्या नोकरावर तूं जितका विश्वास ठेवतोस तितका तुझा स्नेही जो मी, त्याच्यावर तर ठेवशील कीं नाहीं ?" सांगण्याचें तात्पर्य असें कीं, जो तोंडानें 'मी घरांत नाहीं' असें सांगतो, तो घरांत आहेच, असें निश्चित समजावें. कांहीं नाहीं, हें कांहींनाहींची सिद्धि करूं शकत नाहीं. 'कांहीं नाहीं' हें 'कांहीं आहे लाच' कळतें. 'नाहीं' हें व्यक्त होण्याकरितां तरी 'सदाचेंच' म्ह० 'कांहीं आहेचेंच' अधिष्ठान लागतें, ('तरी कांहीं नाहीं सर्वथा । ऐसी जरी व्यवस्था । तरी नाहीं हे प्रथा । कवणासी पा ॥' अमृ० ४-२६). दिवा मालवल्याबरोबर जर दिवा मालवणारा नष्ट होईल तर 'दिवा नाहीं' हें तरी कोणाला कळेल ? ('माल्हवितां दिवे । माल्हवितें जरी

मालवे । तरी दीपु नाहीं हें फावे । कवणासी पा ॥'अमृ०४-२८).
'कांहीं नाहीं ' ही जाणीव 'कांहीं आहेचीच म्ह० जाणणाऱ्याचीच' सिद्धि करते. तात्पर्य, शून्यसिद्धान्त हा तर्क, युक्ति व अनुभव यांच्यापुढें न टिकणारा अतएव फोल आहे.

हें निरुपाधिक शुद्ध आत्मस्वरूप कशाप्रकारचें आहे ह्याची कल्पना येण्याकरितां ज्ञा०म० नीं आणखी दोनतीन मार्मिक दृष्टांत दिले आहेत. ज्ञा०म०ची प्रतिभा अलौकिक आहे. सिसेरोनें प्लेटोचें वर्णन करतांना असें म्हटलें आहे कीं, जुन्या व नव्या लेखकांत प्लेटो हा एकमेवच असा आहे कीं, ज्यानें तत्त्वज्ञानाला भाषेच्या गौरवाची जोड दिली आहे. ( " Plato alone of all writers, ancient and modern, has imparted to philosophy the glory of style " ) परंतु त्यानें ज्ञा०म०चे ग्रंथ वाचले असते तर alone (म्ह०फक्त) असा शब्द योजला नसता. ज्ञा०म०ची प्रतिभा ही अतुलनीय आहे त्यांनीं आत्म्याच्या शुद्धतेचा सूक्ष्मविचार अनुभवामृतांत मोठ्या मार्मिक दृष्टांतांनीं पटवून दिला आहे. कल्पना करा, एखादा अगदीं काळाकुट्ट मनुष्य निबिड अंधकारांत उभा असला, सूर्यास्त होऊन बराच वेळ झालेला असला व तेथें दिवाहि नसला, तर त्याचा देह लोकांना दिसत नाहीं व त्याला स्वतःलाहि दिसत नाहीं पण तो जसा त्या ठिकाणीं असतोच ('कां काळा राहे काळवखां । तो आपणा ना आणिकां । न चोजवे तऱ्ही आसिका । हा मी बाणे ॥ ' अमृ. ४.३६ ) त्याचप्रमाणें आत्मा हा असूनहि तो कोणालाहि विषय होत नाहीं. तो दाखविण्यासारखा नाहीं. ज्याप्रमाणें रस्त्यावरील फेरीवाला, 'छ छ आना, कुईबी चीज उठाव ' असें ओरडत असतो, त्याप्रमाणें आत्मा ही मिळणारी गोष्ट नाहीं ('न संदृशे तिष्ठति रूपमस्य न चक्षुषा पश्यति कश्चनैनम् ।। ' कठ. उप. २-६-९ ).

वरील काळ्या माणसाच्या दृष्टांतांत त्याचे ठिकाणीं 'मी आहें' असें तरी भान असतें; परंतु आत्म्याचें अविषयत्व इतकें अगाध

आहे कीं, तो आपला आपल्यालाहि विषय होत नाहीं. दुसऱ्याची नजरबंदी करणें ही गोष्ट जादुगार करूं शकतो. उदाहरणार्थ, रस्त्यावर गारुड्याचा खेळ चाललेला आहे. त्याचा डमरू वाजवणारा डुमडुम वाजवून लोकांचें लक्ष वेधित असतो. गारुडीहि खेळ करीत असतांना 'देखो रावसाहेब ! देखो भाऊसाहेब ! चल चल, देखो देखो' असें तोंडानें सारखे बडबडत असतो व आपल्या जवळची एक खापरखुंटी काढून म्हणतो, "बघा भाऊसाहेब ! मी आतां आपणाला या खापरखुंटीचा रुपया करून दाखवितों. आपणासारखे रावसाहेब, बाबासाहेब, काकासाहेब माझा खेळ पहाण्यास तरी कोठून मिळणार ?" एखाद्याला असें वाटत असतें कीं, ही त्याची निरर्थक बडबड चाललेली आहे, परंतु त्याचें सगळें कौशल्य या बडबडींतच असतें. अशा या बडबडण्यानें व डमरू वाजवण्यानें तो लोकांचें लक्ष खापरखुंटीवरून दुसरीकडे फांकीत असतो व 'देखो, चल चल' असें म्हणत, एका हातानें खापरखुंटी पळवितो व दुसऱ्या हातानें तिच्या ऐवजीं रुपया आणून ठेवतो. हें सर्व तो इतक्या जलदीनें व शिताफीनें करतो कीं, पहाणाऱ्याच्या लक्षांतहि येत नाहीं कीं, ती खापरखुंटी केव्हां जाते व तिच्याजागीं रुपया केव्हां येतो. जर त्याला खरोखरच खापरखुंटीचे रुपये करतां येत असते, तर मग तो रस्त्यावर खेळ करून भीक कां मागत असता ? मग सरकारी टांकसाळ तरी कशाला ? यालाच नोकरीवर ठेवले कीं वाटेल तेवढे चांदीचे रुपये तयार ! हाच गारुड्याचा दृष्टांत देऊन ज्ञा० म० म्हणतात–'हे गुरुराया, दुसऱ्याची नजरबंदी करणें ही गोष्ट जादुगार करू शकतो, पण तो आपली स्वतःची नजरबंदी करीत नाहीं. परंतु आपलें एवढें मोठें विलक्षण नवल आहे कीं, आपण आपली स्वतःचीहि नजरबंदी करतां म्हणजे आपण आपल्यालाहि विषय होत नाहीं ('कीं पुढीलाची दृष्टि चोरिजे । हा दृष्टिबंधु निफजे । परी नवल लाघव तुझें । जें आपणपें चोरे ॥' ज्ञा. १४-५; 'सर्व सिद्धाताचिया

उजरिया । सांडोनियां निदसुरिया । आपुलिया हाता चोरिया । आपणचि जो ॥ ' अमृ. ५-३९ ).

ज्ञा०म०नीं आत्मा हा आपला आपल्यालाहि विषय होत नाहीं हें पटवून देण्याकरितां एक मोठा गोड दृष्टांत दिला आहे. एखादा मनुष्य निर्जन अशा अरण्यांत एकटाच लाकडें तोडण्यास जातो व दमला असतां तेथेंच कुऱ्हाड टाकून झाडाखालीं झोपतो. आतां तो एकटाच निर्जन अरण्यांत गेलेला असल्यामुळें तेथें त्याला बघणारा असा दुसरा कोणीहि नाहीं; व तो स्वतः झोपेंत असल्यामुळें त्याचें त्याला स्मरणहि नाहीं. परंतु अशा स्थितींत तो जसा ' नाहीं ' असें म्हणतां येत नाहीं (' जो निरंजनीं निदेला । तो आणिकीं नाहीं देखिला । आपुलाहि निमाला । आठवू तया ॥ ' अमृ. ४-३३ ). त्याचप्रमाणें आत्मा हा ' असणें नसणें व भान अभान ' यांपैकीं कोणत्याहि धर्माला न शिवतां, तो संविद्रूप सहजपणानें नित्य आहे (' परी जीवें नाहीं नोहे । तैसें शुद्ध असणें आहे । हें बोलणें न साहे । असे नाहींचे ॥ अमृ.४-३४ ).

हेंच खरें शुद्धतेचें लक्षण आहे. ती आत्मवस्तु अहं–इदं स्फुरण-रहित व अज्ञान–ज्ञान या दोन्हीं उपाधिरहित अशी केवळ ज्ञान-मात्र शुद्ध आहे व तिचें वर्णन मांडुक्योनिषदांत ' प्रपंचोपशमं शांतं शिवमद्वैतम् ' असें केलें आहे. लक्ष्मणानेंहि रामाचें वर्णन रामगीतेंत ' त्वं शुद्ध बोधोऽसि हि सर्वदेहिनामात्माऽस्यधीशोऽसि निराकृतिः स्वयम् ॥' असेंच केलें आहे. तेव्हां दुसऱ्याला शुद्ध करण्याकरितां आपण स्वतः इतकें शुद्ध व्हावयास पाहिजे. नाहींतर ज्याला स्वतःची खरूज बरी करतां येत नाहीं, तो दुसऱ्याचा नायटा काय बरा करणार ! संत हे स्वतः आत्मानुभवी होण्यास्तव ते स्वतः आत्म्याप्रमाणेंच शुद्ध असतात व म्हणूनच अपवित्राला पवित्र करण्याचें सामर्थ्य त्यांचे ठिकाणीं असतें. (' जयाचेनि कृपासलिलें । जीउ हा ठायवरी पाखाळे । जें शिवपणहि वोविळें । अंगीं न लवी ॥' अमृत–२–११ ). संतांच्या ठिकाणीं असलेलें

हें अगाध पावित्र्य ज्ञानेश्वरमहाराज 'शुद्ध' या एका शब्दानें व्यक्त करतात.

आतां आपण 'उदारे प्रसिद्धे' या पदाचा थोडक्यांत विचार करूं. मनुष्य किती जरी मोठा असला पण त्याचे ठिकाणीं जर औदार्य नसेल तर त्याच्या घरीं वारंवार जाण्या-येण्यानें कपाळाला ठोकरी मात्र बसतील, यापेक्षां अधिक फायदा होणार नाहीं. मोठेपणाबरोबर औदार्यहि असावें लागतें. संतांचे ठिकाणीं अगाध औदार्य असतें व म्हणून जगाला त्यांचा उपयोग होतो. उदारपणाबद्दल अथवा दातृत्वाबद्दल जगतांत मुख्यत: तीन वस्तु प्रसिद्ध आहेत. एक कल्पतरु, दुसरी चिंतामणि व तिसरी कामधेनु. ह्यांच्याजवळ चिंतिलेली वस्तु प्राप्त होते, परंतु कल्पना करणारा जर दुर्दैवी असेल तर ह्या वस्तु प्राप्त होऊनहि त्याचा नाश होऊं शकतो. उदाहरणार्थ, एक अभागी मोळीविक्या दरिद्री मनुष्य उन्हांत तापल्यामुळें सावलीसाठीं एका झाडाखालीं बसला. कर्मधर्मसंयोगानें तें झाड कल्पतरूचें होतें. उन्हांत तापल्यामुळें व तहातेनें व्याकुळ झाल्यामुळें त्याच्या डोक्यांत सहजच कल्पना आली कीं, आपणास यावेळीं प्यावयास थंडगार पाणी मिळेल तर फार बरें होईल. अशी कल्पना केल्याबरोबर त्याच्यापुढें वाळा घातलेला व थंड पाण्यानें भरलेला असा एक चांदीचा पेला उत्पन्न झाला. तो पाहून त्याला फार आनंद झाला व त्यानें तें पाणी लगेंच पिऊन टाकलें. मग त्याच्या मनांत असा विचार आला कीं, आपणास बसावयास थंडगार सावली व पिण्यास गार पाणी तर मिळालें. पण त्याबरोबर आपणांस जर जेवावयास कांहीं मिळेल तर फार चांगलें होईल. इतक्यांत त्याच्यासमोर पंच पक्वान्नांनीं वाढलेलें असें आयतें एक चांदीचें ताट तयार होऊन पुढें आलें. त्याच्यावर त्यानें यथेच्छ ताव मारला. एकदां मनुष्याचें पोट यथेच्छ भरलें म्हणजेच मग त्याला दुर्बुद्धि सुचत असते व तो तर अभागीच होता. नंतर त्याला असें वाटलें हा कीं, सर्व खेळ एखाद्या भूताचा तर नाहींना, व तें भूत आपणास खाणार तर

नाहींना ! त्याबरोबर तेथें एक भूत उत्पन्न झालें व त्यानें त्याला पेढ्यासारखे गट्ट केलें. तात्पर्य, अशा वाटेल त्या म्ह० घातकी कल्पनाहि पुऱ्या करणारा कल्पतरु, चिंतामणी अथवा कामधेनु हीं जरी प्राप्त झालीं तरी काय उपयोगाचीं ? शिवाय या तीन वस्तु मनुष्याच्या कल्पना व कामना अधिकाधिक वाढवितात. साधूंची उदारता ह्यांच्याहून फार निराळी. त्यांच्याजवळ येणारा जरी दुर्दैवी असला तरी त्याच्या उद्धारच होतो व त्याच्या सर्व कल्पना व कामना नष्ट होतात. संत हे कल्पनातीत अशी जी ब्रह्मवस्तु ती प्राप्त करून देणारे कल्पतरु आहेत. ( ' जयजय देव श्रीगुरो । अकल्पनाख्यकल्पतरो ।' ज्ञा. १८–१० ). ही आत्मवस्तु प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य कल्पतरु, चिंतामणी इत्यादिकांचे ठिकाणीं नाहीं. म्हणून संतांची उदारता ह्या तिन्ही वस्तूंपेक्षां श्रेष्ठ ठरते. ( ' या संतांचें हें देणें । कल्पतरूहूनि दुणें । परीस परीस अगाध देणें । चिंतामणि ठेंगणा ॥ ' ज्ञा. गा. २१९ ).

संतांची उदारता भगवंतापेक्षांहि अधिक आहे. नामदेवरायांचा या बाबतींत एक सुप्रसिद्ध अभंग आहे. ते देवाला म्हणतात—' उदारांचा राणा म्हणविसी आपणां । सांग त्वा कवणा काय दिलें । ' ( नामा० – ४७२ ). मनुष्य खरा कोणत्या स्वभावाचा आहे हें त्याच्या घरांतील माणसांना अधिक चांगलें ठाऊक असतें. पोथी सांगण्यास बसलेला बुवा दुसऱ्यांना चांगलाच दिसणार ! पण घरांतील माणसांना विचारून पहा. कित्येक वेळां ते म्हणतांना दिसतात, " अहो ! हे तुम्हांला फार सालस दिसतात. पण घरांतील माणसांना ते जातां–येतां ठोकर देतात.' त्याचप्रमाणें देवाची उदारता आपण सुदाम्याला विचारा ! भगवंतांनीं सुदाम्याला सुदामनगरी सोन्याची करून दिली ही गोष्ट खरी, परंतु पहिल्यांदा त्याच्या जवळचे मूठभर पोहे भगवंतांनीं खाल्ले व तेंहि त्याला सर्व मंडळींत ओशाळें करून. म्हणूनच नामदेवराय देवाला या बाबतींत हडसूनखडसून विचारतात, ' घेसी तेव्हां देसी ऐसा असशी उदार । काय रोधूं देवा तुमचें कृपणाचें द्वार '. भगवंतांनीं

दुर्वासांना भोजन घातलें पण तत्पूर्वी त्यांनीं द्रौपदीजवळून भाजीचें पान खाल्लें तेव्हांच ! आपला वाणी आपल्याला तूप, साखर देतो, परंतु त्याबद्दल तो उदार आहे, असें आपण त्याचें वर्णन करीत नाहीं. कारण तो पैसे घेतो आणि मग माल देतो. ‘ घीनो पैसो व पैसोनो घी ’. त्याचप्रमाणें देव प्रथमतः कांहींतरी घेतो व मग देतो.

परंतु संत हे कशाचीहि अपेक्षा न करतांना आपल्या जवळ येणाऱ्याचें कल्याण करतात. दधिची ऋषींनीं कांहींहि मोबदला न घेतां इंद्राला वज्र करण्याकरितां स्वतःचीं हाडें दिलीं. दुष्ट लोक कित्येक वेळां संतांना शिव्या देतात, छळतात व मारतातहि. गाढवानें लाथा मारणें हा जसा त्याचा स्वभावच आहे, त्याचप्रमाणें दुष्टांनीं साधूंना छळणें हा त्यांचा प्रकृतिधर्मच आहे. परंतु संत हे मार खाऊनहि पुन्हा दुष्टांचें कल्याणच करतात, किंबहुना त्यांच्या ठिकाणीं त्यांच्याबद्दल अधिक कळकळ असते ( ‘ जे खळांची व्यंकटी खांडो । तया सत्कर्मी रती वाढो ॥ ’ ज्ञा० १८–१७९४ ). अशी संतांची निर्निमित्त उदारता असते. ( ‘ प्रत्युपकार न वांछिता । मी कारुणिक हे नाहीं अहंता । ऐसेनि दीनदुःख निवारिता । कारुण्य सर्वथा त्या नाव ॥ ’ ए. भा. ११–१०४३ ).

देवाच्या ठिकाणीं आपपर भाव आहे, कारण तो आपल्या भक्तांचा प्रतिपाळ करतो व शत्रूंचा संहार करतो. ( ‘ भक्तां राखे पायापाशीं । दुर्जनासी संहारी । ’ तुका० २९४६ ). परंतु संत हे आपल्या शत्रूंचेंहि कल्याण करतात. वाल्या कोळी नारदांना ठार मारावयास तयार झाला होता; परंतु नारदांनीं त्याचा उद्धार करून त्याला अशी योग्यता प्राप्त करून दिली कीं, तो पुढें वाल्मिकी ऋषि झाला. देव दुष्टांना जिवंत ठेवून मोक्ष देऊं शकत नाहीं; तर संत दुष्टांना सुष्ट करतात व ह्याच जन्मांत त्यांचा उद्धार करतात. त्यांच्या ठिकाणीं मोठा–लहान, अधिकारी–अनधिकारी

असा भेद नसतो. ('तुवां व्यास देखोनि सज्ञान । उपदेशिलें गुह्यज्ञान । ध्रुव बालक अज्ञान । म्हणोनि जाण नुपेक्षिसी ॥' ए. भा. २–७२ ). देव भक्तवत्सल आहे तर साधु दीनवत्सल आहेत ( 'अवतार तुम्हां उद्धाराया कारण । उद्धारावे जन जड जीव ॥' तुका० १९६६ ).

देव भक्तांच्या इच्छेनुसार फल देणारा आहे ( 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥' गीता ४–११ ). आपण त्याच्या जवळ जी गोष्ट मागूं ती 'तथास्तु' म्हणून तो देतो; परंतु ती देतांना त्यांत मागणाऱ्याचें हित आहे का अनहित आहे, हें तो पहात नाहीं. उदाहरणार्थ, हिरण्यकशिपूनें देवाजवळ 'मी रात्रीं मरूं नये, दिवसा मरूं नये' वगैरे अनेक गोष्टी मरण चुकविण्याकरितां मागितल्या. देवानें त्या सर्व दिल्या; पण असा उपदेश त्यास केला नाहीं कीं, शरीर हें कधींच अमर होणार नाहीं. खुद्द भगवंताच्या रामकृष्णादिक अवतारांचे विग्रह टिकले नाहींत; मग मनुष्याचें शरीर अमर कसें काय होणार ? कल्पवृक्ष काय कल्पना करावी, हें जसें शिकवत नाहीं, तसेंच देव अमुक माग, म्हणून कधींहि सांगणार नाहीं.

खुद्द भगवंताच्या वडिलांनाहि आत्मज्ञानाकरितां नारदांनाच शरणागति करावी लागली. वसुदेवाच्या घरीं भगवान् श्रीकृष्ण त्याचा मुलगा होऊन नांदत होते. म्हणून भगवंताला भेटण्याकरितां नारद वसुदेवाच्या घरीं नेहमीं येत. एकदां असा योग आला कीं, भगवंत घराच्या बाहेर कांहीं कामाकरितां गेले असतांना नारद भगवंताला भेटण्याकरितां म्हणून वसुदेवाच्या घरीं आले. मग सहाजिकच वसुदेव व नारद यांची एकांतांत गांठ पडली. तेव्हां वसुदेवानें नारदाला आपणांस ब्रह्मज्ञान सांगावें म्हणून विनंती केली. तेव्हां नारद मोठे आश्चर्यचकित झाले. अलीकडचा दृष्टांत देऊन सांगावयाचें तर एखाद्यानें बीड जिल्ह्यांत तांदूळ खरेदी करावा व रत्नागिरीला तो विकण्याकरितां न्यावा,

त्याचप्रमाणें नारद म्हणाले, "अरे वसुदेवा! तुझा मुलगा साक्षात् भगवान् श्रीकृष्ण असतांना तुझ्या घरीं ब्रह्मज्ञानाला काय तोटा आहे! अशा स्थितींत तूं आम्हांला ब्रह्मज्ञान सांगा म्हणून विनंती करावीस, हें मोठें आश्चर्य आहे." यावर वसुदेव म्हणाला, "नारदा! मी श्रीकृष्णाला ब्रह्मज्ञान सांग असें म्हटलें असतां तो म्हणतो, 'तुम्ही तर माझे बाबा! मी तुम्हांला काय शिकविणार? वळचणीचें पाणी कधीं आढ्याला जातें काय?' मीं पूर्वीं तप केलें व देवाजवळ 'ब्रह्मज्ञान दे' असें न मागतां मी त्याच्याजवळ 'तूं माझा पुत्र हो' असें मागितलें व त्यानें 'तथास्तु' म्हणून तें मला दिलें. परंतु त्या वेळीं त्यानें श्रेय जें ब्रह्मज्ञान तें मागून घे, असें मला सांगितलें नाहीं व म्हणूनच मला आज तुमच्याजवळ 'ब्रह्मज्ञान' सांगा अशी विनंती करावी लागत आहे ('म्यां पूर्वीं आराधिलें देवराया। तें भजन ममता नेलें वाया। प्रलोभविलो देवमाया। पुत्रस्नेहा लागोनी॥ तो हा माझा पुत्र श्रीकृष्ण। परी मज न सांगे ब्रह्मज्ञान। तोचि वंदी माझे चरण। म्हणे बालक पूर्ण मी तुझें॥' ए.भा. ८६–८८)." पुढें नारदांनीं वसुदेवाला आत्मज्ञान सांगून त्याचा उद्धार केला. संत त्यांच्याजवळ येणाऱ्यानें जरी पुत्रधनादि ऐहिक भोगांची मागणी केली तरी ते त्याची ती मागणी पुरवीत नाहींत ('माझ्या मुखावाटा नयो हें वचन। व्हावें हें संतान द्रव्य कोणा।' तुका. २११३) उलट त्याच्या ठिकाणीं भगवद्भक्तीची आवड उत्पन्न करतात व त्याचा उद्धार करतात ('निळा म्हणे धराल हातीं। तरी द्याल मति निरुपम'॥ निळा. १५८६). देव वर देतो पण पुन्हा अदृश्य होतो, पण साधु आपल्या शिष्याकडून परमार्थाचा अभ्यास प्रत्यक्ष करून घेतात व त्याला आपलें पद देतात म्हणजे 'मी ब्रह्म आहे' अशा अपरोक्ष अनुभवावर आणून ठेवतात ('कृपाकटाक्षें न्याहाळिलें। आपुल्या पदीं बैसविलें। बापरखुमादेवीवरु विठ्ठलें। भक्तां दिधलें वरदान॥' ज्ञा. गा. २२९). तात्पर्य, अशा प्रकारें संत हे भगवंतापेक्षां अधिक उदार ठरतात.

संत आपलें पद आपल्या शिष्याला देतात पण त्याबरोबर ते आपलें ऐश्वर्य व गुरुपणा मात्रा गमावीत नाहींत. नाहींतर हरिश्चंद्रानें स्वप्नांत राज्यदान केलें व त्याचा परिणाम असा झाला कीं, तो डोंबाच्या घरीं पाणी भरत बसला. संत जरी आपल्या शिष्याला कृतार्थ करतात तरी त्यांच्या गुरुपणांत कांहीं कमीपणा येत नाहीं. एका दिव्यावर जरी हजारों दिवे लावले, तरी त्या मुळच्या दिव्याच्या प्रकाशांत व तेजांत जशी कांहींहि उणीव येत नाहीं त्याप्रमाणें संतांनीं जरी अनेक साधकांना कृतार्थ केले तरी त्यांच्या गुरुत्वामध्यें किंचित्‌हि कमीपणा येत नाहीं ( 'राखों जातां शिष्यातें । गुरुपणहि धाडिले थितें । तऱ्हीं गुरुगौरव जयातें । सांडीचीना ॥' अमृ. २–१२ ). अशा प्रकारें संतांचें औदार्य अलौकिक अमुप असल्यामुळें ज्ञानदेवमहाराज त्यांच्या औदार्याचें वर्णन ' प्रसिद्ध ' या विशेषणानें करतात.

संतांचें औदार्य 'सुप्रसिद्ध' आहे, असें म्हणण्याचें कारण आजपर्यंत आत्मानुभव हा संतांच्या कृपेखेरीज कोणत्याहि प्राप्त झालेला नाहीं. औदार्याचे अथवा दानाचे मुख्यतः तीन प्रकार आहेत– कनिष्ठ दान, इच्छेनुसार दान व अपार दान. याचक मागेल त्यापेक्षां कमी देणें, याला कनिष्ठ दान म्हणतात. याचक मागेल तेवढेंच देणें याला इच्छेनुसार दान म्हणतात व याचकाची योग्यता व अधिकार न पाहतां तो मागेल त्याच्यापेक्षां सहस्रपट देणें याला ' अपार ' दान म्हणतात. संत हे अपार दान देणारे आहेत. त्यांचें औदार्य मेघासारखें असतें. मेघ ज्याप्रमाणें वर्षाव करतांना ही सुपीक आहे कां खडकाळ जमीन आहे, हें पाहात नाहीं; त्याचप्रमाणें संत उपदेश करतांना लहान–मोठा, गरीब–श्रीमंत, शत्रु–मित्र, विषयासक्त अथवा वैराग्यसंपन्न असा भेद पाहात नाहींत. ( ' पैं गुरुशिष्यांचा एकांतीं । जे अक्षरा एकाचि वदंती । ते मेघाचिया परी । त्रिजगतीं । गर्जती सैंध ॥' ज्ञा.–१०–१२६ ). ज्याप्रमाणें सिंह हा हत्तीचें गंडस्थळ फोडतो व त्यांतील मोती बाहेर काढतो, असा कवि संकेत आहे, त्याचप्रमाणें

संत हे मायारूप हत्तीचें गंडस्थळ फोडून त्यांतील मुक्तिरूप मोत्यांचें जेवण जीवाला घालतात, म्हणजे मायेच्या निरासाअंतीं राहाणारें जें आत्मतत्त्व त्याचा अनुभव जीवाला आणून देतात. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज संत हे 'सुप्रसिद्ध' उदार आहेत असें म्हणतात. ('मोडोनि मायाकुंजरु। मुक्तमोतियाचा वोगरु। जेवविता सद्‌गुरु। श्रीनिवृत्ति वंदू।। अमृत० २-३ ).

संतांचें औदार्य कशांत आहे म्हणजेच संत आपल्याजवळ येणाऱ्यास काय देतात, हीच गोष्ट ज्ञानेश्वरमहाराज 'अनवरत आनंदें। वर्षतिये।।'या पादानें स्पष्ट करून सांगतात. संत हे आपल्याकडे येणाऱ्यावर अनवरत आनंदाचा वर्षाव करतात, म्हणजे त्याला अखंड आत्मानंदाचा लाभ करून देतात. नाहींतर जगतांत कांहीं लोक असे असतात कीं, ज्यांची संगति झाली झाली तर संगति करणाऱ्याचें नष्टचर्यच ओढवलें असें समजावें. ('उदैजणें केतूचें जैसें। विश्वा अनिष्टोद्देशें। जन्मती ते तैसे। लोकां आट्ठ।।' ज्ञा० १६-३१९). ह्याच्या उलट संत जिकडे दृष्टिक्षेप टाकतात तिकडे सर्व सुखमयच होऊन जातें. ('तो जेउती वास पाहे। तेउती सुखाची सृष्टि होये। तो म्हणे तेथ राहे। महाबोधु।।' ज्ञा०-५-७४ ).

संत जो आनंद देतात त्याच्यामागें ज्ञानेश्वरमहाराजांनीं 'अनवरत म्ह० अखंड' असें एक महत्त्वाचें विशेषण योजलें आहे. आपण लौकिकांत ज्याला विषयानंद म्हणतों, त्या आनंदाहून आत्मानंद अगदीं वेगळ्या जातीचा आहे. विषयानंद हा कांहीं काळपर्यंतच टिकतो व शेवटीं त्याचें पर्यवसान दुःखांतच होतें. तो तुटका, फुटका व अल्प असा आहे. साधूंच्या कृपेनें मिळणारा आनंद हा अखंड व अमर्याद असा आहे ('देशे काळे वेदानुवादा। ज्या सुखाची न करवे मर्यादा।।' ए. भा. १४-२०१ ).

प्रत्येक मनुष्याला या आनंदाची आवश्यकता आहे व तो त्यासाठीं अहर्निश खटपटहि करीत असतो. परंतु साधूंच्या कृपे-

विना हा आनंद प्राप्त होत नाहीं. लौकिकांतील कोणत्याहि विषयाची जरी प्राप्ति झाली तरी त्यानें मनुष्य पूर्णतः आनंदी होऊं शकत नाहीं. त्याचे ठिकाणीं उणीव ही शिल्लक रहातेच व ज्या ठिकाणीं कमतरता आहे, उणीव आहे त्या ठिकाणीं दुःख हें ठेवलेलेंच असतें. मग तो मनुष्य ती उणीव भरून काढण्याकरितां म्हणजेच तें दुःख नाहीसें करण्याकरितां रात्रंदिवस खटपट करीत असतो. त्यांतीलच एक भाग म्हणून तें दुःखनिवारणार्थ तो देवाजवळहि प्रार्थना करतो. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्याचें लग्न होत नसलें तर तो देवाजवळ, 'कधीं करिसी लग्न माझें' अशी प्रार्थना करीत असतो. ह्याच्या उलट ज्याचे ठिकाणीं मुळांतच कोणतीहि कामना नसते व जो सदा आत्मानंदानें परिपूर्ण असतो, त्याचे ठिकाणीं दुःख नसतें व तो सदा तृप्तच असतो ('चंद्रमा कळीं घाला । न दिसे कोणें आंगीं वोसावला। तेवी अपेक्षेचा अवखळा । न पडे जया ॥' ज्ञा० १५–३०३). आपण या बाबतींत श्रीरामकृष्ण परमहंस यांचें चरित्र पहा. अशा महात्म्यांचीं चरित्रें साधकानें नित्यशः वाचावींत ('जे मुक्तातें निर्धारितां । लाभे आपुलीच मुक्तता । जैसी दीपें दिसे पाहतां । आपुली वस्तु ॥ तैसें हारपलें आपणपें पावे । तैं संतातें पाहतां गिंवसावें । म्हणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥' ज्ञा० १८–३९७-४००).

श्रीरामकृष्णपरमहंस हे नेहमीं ध्यानावस्थेंत असत. तीव्र ध्यानामुळें त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला व त्यामुळें त्यांच्या अंगांत उष्णता फार वाढली. म्हणून जवळच्या मंडळींनीं त्यांची प्रकृति दाखविण्याकरितां त्यांना डॉक्टरकडे नेलें. बिचाऱ्या डॉक्टरांना, रामकृष्णांच्या अवस्थेची काय कल्पना असणार? त्यांनीं निदान केलें कीं, ज्याअर्थी त्यांच्या अंगांत इतकी उष्णता वाढली आहे, त्याअर्थी यांचें लग्न करून देणें हें चांगलें. सामान्यतः डॉक्टरांच्याकडे जे रोगी येतात त्यांतील कांहीं लग्नाच्या अभावीं उष्णता वाढल्यामुळें आजारी झालेले असतात. यामुळें डॉक्टरानें असें असें निदान करावें हें

अगदीं स्वाभाविकच आहे. कारण त्यांच्या पाहाण्यांत ध्यानानें अंगांत उष्णता वाढलेला, असा रोगी येणें अशक्य आहे. जेव्हां जवळच्या मंडळींनीं श्रीरामकृष्णाचें लग्न करावयाचें ठरविलें तेव्हां ती बातमी त्यांच्या कानावर गेली. परंतु त्यांना त्याची दादहि नव्हती. कारण ते सदा विदेही स्थितींतच असत. त्यांना लग्न झालें काय आणि न झालें काय हीं दोन्हीं सारखींच. असे महात्मे आपल्या स्वानंदानें सदा परिपूर्णच असतात. त्यांचा आनंद अखंड, अमर्याद व निरुपचार असतो (' वार्षियेंवीण सागरु। जैसा जळें नित्य निर्भरु। तैसा निरूपचारु। संतोषी जो॥ ' ज्ञा. १२-१५१). याच्या उरुट प्रापंचिक माणसाचा आनंद अनुकूल विषयाच्या प्राप्तींत असतो. तो विषय त्याला मिळाला म्हणजे तात्पुरतें त्याला सुख होतें पण तें कायमचें टिकत नाहीं. एखाद्या मनुष्याला मुलगा नसला तर त्याची प्राप्ति व्हावी म्हणून तो देवाकडे जातो, व त्याची करुणा भाकतो. त्यामुळें आपलें दुःख निरसन होईल असें त्याला वाटतें. पण एक दुःख नाहींसें झालें, तरी दुसरें दुःख पुन्हां उत्पन्न होतेंच. समजा, मुलगा झाला तरी तो पुढें कसा निघेल याविषयीं काळजी उत्पन्न होते, व त्यामुळें दुःख होतें. माझ्या ओळखीच्या एका गृहस्थास म्हातारपणीं मुलगा झाला. आतां मुलगा झाला म्हणून त्यास आनंद व्हावयास पाहिजे, पण मुलगा लहान व इस्टेट फार मोठी, यामुळें त्याच्या ठिकाणीं काळजी उत्पन्न झाली. आपल्या पश्चात् इस्टेट संभाळण्यासाठीं विश्वस्त म्हणून एखादा नेमावा तर तो विश्वस्तच इस्टेट गिळंकृत करण्याचा अधिक संभव!

सारांश, आपणास विषयप्राप्तीनें जो आनंद मिळतो, तो कायम राहात नाहीं. साधुकृपेनें मिळणारा आनंद हा अखंड व अविनाश असतो व म्हणूनच ज्ञानदेवमहाराजांनीं या आत्मानंदाचें वर्णन ' अनवरत ' या विशेषणानें केलें आहे.

संत जरी निष्कांचन असतात (' आम्ही सदैव सुडके। जवळी येतां चोर धाके। ' तुका १७३७), तरी त्यांच्या ठिकाणीं

अमुप आनंद असतो. राजाजवळ जरी गडगंज संपत्ति असली तरी तो चिंतेनेंच व्याप्त असतो ( uneasy lies the head that wears the crown ). म्हणूनच संतांच्या सान्निध्यांत मनुष्याला दुःखाचा विसर पडतो व त्याला इतका आनंदाचा लाभ होतो कीं, त्रिविध दुःखें जरी प्राप्त झालीं तरी त्याच्या चित्तांतील आनंद कमी होत नाहीं. ह्याचें कारण आनंदरूप जो आत्मा ( 'यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति ।'. छां. उ. अ.-७-२३ ). त्याची प्राप्ति संत करून देतात व यामुळें जीवाला अमर्यादित व अनंत अशा आत्मानंदाचा लाभ होतो, म्हणूनच संत हे आनंदाचा वर्षाव करतात असें म्हटलें आहे.

प्रत्येक जीवाच्या ठिकाणीं आत्म्याच्या 'सत्, चित् व आनंद' या तीन स्वरूपलक्षणांपैकीं पहिल्या दोन लक्षणांची जाणीव असते. म्हणजे 'मी आहें' व 'मी ज्ञाता आहें' असें ज्ञान प्रत्येकाला असतें. फक्त उणीव जर कशाची असेल तर ती आनंदाची. ह्या आनंदाचा लाभ संत करून देतात व ज्याला हा लाभ होतो तो सदा आनंदांतच निमग्न होऊन राहातो. हें सर्व केवळ संतांच्या कृपेनेंच होऊं शकतें याविषयीं एक कथा सुप्रसिद्ध आहे. ती अशी—

श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर महाराज यांचा मुक्काम एकदां पंढरपुरांत असतांना त्यांचें रोज रात्रीं कीर्तन श्रीपंढरीनाथाच्या राउळांत होत असे. 'वाऱ्या हातीं माप चाले सज्जनाचें । कीर्तिमुख त्यांचें नारायण ।' ( तुका० २७७९ ) या न्यायानें उत्कृष्ट कीर्तनकार म्हणून रंगनाथस्वामींची कीर्ति अगोदरच जिकडेतिकडे प्रसृत झालेली होती. त्यामुळें त्यांच्या कीर्तनास रोज अतोनात गर्दी होत असे. शिवाय पांडुरंगाचें देऊळ, रंगनाथस्वामींसारखा वक्ता व श्रोतृसमुदाय पुष्कळ, त्यामुळें कीर्तनास रोज फारच रंग येत असे. तशांत दुधांत साखर पडावी याप्रमाणें श्रीसमर्थ रामदासस्वामीहि सहजगत्या पंढरपुरास आले. ही वार्ता रंगनाथ-

स्वामींच्या कानावर गेली. पण समर्थ कोणाच्या घरीं उतरले आहेत हें मात्र त्यांना कळलें नाहीं. समर्थांनीं आपल्या कीर्तनास यावें अशी त्यांच्या ठिकाणीं उत्कट इच्छा उत्पन्न झाली व म्हणून त्यांनीं कीर्तन संपल्यानंतर असें जाहीर केलें कीं, श्रीसमर्थ रामदासस्वामी हे पंढरपुरांत आलेले आहेत. तेव्हां त्यांची व माझी जो कोणी गांठ घालून देईल, त्याला मी तो मागेल तें देईन. त्याबरोबरच त्यांनीं समर्थांना ओळखतां यावें म्हणून त्यांची अंगयष्टि वगैरे कशी काय आहे तेंहि सांगितलें. ज्या भिक्षुकाच्या घरीं समर्थ उतरले होते त्याला हें ऐकून फार आनंद झाला. त्यानें मनांत असा विचार केला कीं, उद्यां समर्थांची व रंगनाथस्वामींची गांठ आपण घालून देऊं व रंगनाथस्वामींच्याकडून रगड पैसा मागून घेऊं. मग आपल्या नाऱ्याची मुंज, किशीचें लग्न वगैरे सर्व उरकून टाकूं व आपण या चिंतेंतून मुक्त होऊं. अशा कल्पनानंदांत तो आपल्या घरीं येण्यास निघाला. परतु मौज अशी झाली होती कीं, त्यानें समर्थांना उतरावयास जी जागा दिली होती, ती गाईच्या गोठ्यांत दिली होती. त्याला काय कल्पना कीं, हे समर्थ आहेत म्हणून. त्याला वाटलें कीं,हा कोणीतरी एखादा गरीब पांथस्थ ब्राह्मण पंढरीच्या यात्रेला आलेला आहे. हेंच जर दररोज ५–१० रुपये देणारें असें झळकफळक गिऱ्हाईक असतें तर त्यानें त्याला माडीवर उतरण्यास जागा दिली असती. हा जो भिक्षुक घरीं आला तों एकदम गोठ्यांत जाऊन समर्थांचे पायच रगडूं लागला. त्यावर समर्थ त्याला म्हणाले, " अहो भटजीबुवा, हें तुम्ही काय करतां ? तुम्ही तर क्षेत्रोपाध्ये व म्हणून आम्ही तुमचे पाय वंदावयास पाहिजेत. " तो म्हणाला, ' महाराज ! आपण समर्थ रामदासस्वामी आहांत हें मला आतांपर्यंत कळलें नव्हतें. माझी मोठी चूक झाली कीं, मी तुम्हांला गाईच्या गोठ्यांत उतरावयास जागा दिली. तेव्हां मी आतां आपलें सामान वरच्या माडीवर घेऊन जातों. आपण तेथेंच राहा. " त्यावर समर्थ म्हणाले, "भटजीबुवा, यांत तुम्हांला वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. आमच्या

सारख्या ब्रह्मचारी पुरुषांना उतरण्यास गाईच्या गोठ्यापेक्षां पवित्र अशी दुसरी जागा कोणची असणार ? तेव्हां मी कांहीं माडीवर येणार नाहीं. ” त्यानंतर भिक्षुकानें जें कांहीं श्रीरंगनाथस्वामींनीं कीर्तनाच्या शेवटीं जाहीर केलें होतें, तें सर्व समर्थांना सांगितलें व तो म्हणाला, “ महाराज ! तुम्ही जर उद्यां माझ्याबरोबर स्वामींच्या कीर्तनास आलात तर माझ्या गरिबाचें जन्माचें कल्याण होईल.” समर्थ म्हणाले, “ मी मुळींच येणार नाहीं. ” त्यावर तो गरीब ब्राह्मण पुन्हां गयावया करूं लागला. तो म्हणाला, “ महाराज ! आपण कीर्तनास आल्यानें मला रंगनाथस्वामी, मी मागेन तें देतील. आपण पाहातच आहां कीं, माझ्या मुलाची मुंज व मुलीचें लग्न अजून व्हावयाचें आहे. तेव्हां त्याकरितां मी स्वामींच्याजवळ पैसे मागणार आहे व एकदाचा या सर्व काळजींतून मुक्त होणार आहे. ” समर्थ मोठे दयार्द्र अंतःकरणाचे. त्यांनीं पाहिलें कीं, ‘ आपण ज्याच्या घरीं उतरलों आहोंत त्याचें कार्य होत असेल तर मदत करावी. ’ खरें सांगावयाचें म्हणजे समर्थांच्या मनांत त्या ब्राह्मणाचें शाश्वत कल्याण करावें असें आलें. म्हणून ते त्याला म्हणाले, “ बरें तर, मी येईन कीर्तनाला ! पण एका अटीवर. मी सांगतों तें तुम्ही रंगनाथ स्वामींजवळ मागितलें पाहिजे. तुम्ही त्यांना म्हणा कीं, तुमच्या व रामदासस्वामींच्या भेटींत जो आनंद निर्माण झाला, त्यांतील निम्मा आनंद मला द्या. ” हें ऐकून तो ब्राह्मण थक्कच झाला. तो मनांत म्हणाला, ‘ या ब्रह्मचाऱ्याला गृहस्थाश्रमी माणसाच्या ’ काय अडचणी असतात, ह्याची कल्पना कशी येणार ? उद्यां किशीचें लग्न निघालें म्हणजे मग जावयाला काय ¼ आनंद देऊं ! ज्याच्या पायांत जोडा आहे त्यालाच तो कोठें बोचतो हें कळतें; त्याचप्रमाणें प्रपंची लोकांच्या अडचणी परमार्थी लोकांना कळणार नाहींत. परंतु आतां आपण समर्थ सांगतात तें प्रथमतः स्वामींच्याजवळ मागूं आणि नंतर पैसेहि मागूं. संत हे दयाळु असतात, ते आपली मागणी नाकारणार नाहींत.’ असा मनांत विचार केल्यानंतर तो

समर्थांना म्हणाला, " ठीक आहे ! " दुसऱ्या दिवशीं समर्थ त्या ब्राह्मणाबरोबर स्वामींच्या कीर्तनाला गेले. समर्थांना पाहून स्वामींना मोठा आनंद झाला. ती भेट म्हणजे गीतेंत वर्णन केल्याप्रमाणें ' मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् । ' ( गीता १०-९ ). अशा दोन बोधसंपन्न महात्म्यांचीच होय. त्यामुळें कीर्तनास फारच रंग आला व त्यापासून खूप आनंद निर्माण झाला. कीर्तन संपल्यानंतर रंगनाथस्वामींना आपण आदल्या दिवशीं जें जाहीर केलें होतें त्याची आठवण झाली व ते म्हणाले कीं, ' ज्यानें माझी व समर्थांची गांठ घालून दिली. त्यानें समोर यावें व त्याला काय मागावयाचें असेल तें मागावें.' त्याबरोबर तो भिक्षुक उभा राहिला. समर्थ खाकरले व त्यांनीं डोळ्यांनीं खुणावलें कीं, मी सांगितलें तेंच मागितलें पाहिजे. तेव्हां तो भिक्षूक रंगनाथस्वामींना म्हणाला, " महाराज, आपण व श्रीसमर्थ यांच्या भेटींत जो आनंद निर्माण झाला त्यांतील निम्मा आनंद मला द्या. " रंगनाथस्वामींनीं ओळखलें कीं, ही बुद्धि या ब्राह्मणाची नाहीं. हें समर्थांनीं त्याला शिकविलें असलें पाहिजे. ते म्हणाले, " भटजीबुवा ! हा कोरडा आनंद घेऊन तुम्ही काय करणार ? तुम्ही पैसे, जमीन वगैरे काय पाहिजे असेल तें मागून घ्या. तें मी तुम्हांस द्यावयास तयार आहे." त्यावर त्या ब्राह्मणाच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. तो मनांत म्हणूं लागला कीं, रंगनाथस्वामींना चिकु म्हणावें तर ते वाटेल तेवढा पैसा व जमीन देण्यास तयार आहेत; बरें उदार म्हणावें, तर फुकटचा आनंदहि देण्यास तयार नाहींत. त्या अर्थीं या आनंदाची किंमत पैसा व जमीन यापेक्षां अधिक असली पाहिजे. मग तो रंगनाथस्वामींना म्हणाला,"महाराज ! तुम्ही मला फक्त निम्मा आनंदच द्या." तेव्हां रंगनाथस्वामींनीं समर्थांकडे पाहिलें व म्हणाले,"महाराज ! आपल्या मनातून या ब्राह्मणाला कृतार्थ करावयाचें आहे असें दिसतें व म्हणूनच तो आनंद मागत आहे, येऱ्हवीं या ब्राह्मणाची ही बुद्धि

दा. क्र. १०८१२

नव्हे, तर मी त्याला आनंद देतों." असें म्हणून रंगनाथस्वामींनीं त्या भिक्षुकाच्या मस्तकावर हात ठेवला व त्याबरोबर तो ब्राह्मण ब्रह्मानंदांत तल्लीन झाला. असा अमुप आनंद देणारे संत असल्यामुळें ज्ञा० म० आपल्या गुरूंचें वर्णन 'अनवरत आनंदें । वर्षतिये ॥ असें करतात.

तात्पर्य, सद्‌गुरु हे पाप, ताप व दैन्य घालवून अखंड आत्मानंदाचा लाभ करून देतात ('गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च सद्यःसाधुसमागमः ॥ सुभाषित.) व म्हणून ज्ञा० म० म्हणतात अशा श्रीगुरुमाउलीचा जयजयकार असो. ('जयजय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदें । वर्षतिये ॥ '). गुरूंचा जयजयकार करण्यांत ज्ञा० म० आपली सदिच्छा दर्शवितात व तद्द्वारां लोकांनीं गुरूंना शरणागति करून आपण सुखी व्हावें असें सुचवितात. म्हणून आपण संतांच्या जवळ नेहमीं जावें व त्यांच्याजवळ आत्मानंदाची मागणी करावी. ('तुका म्हणे जवळीं न पाचारितां जावें । संत चरणीं भावें रिघावया ॥ तुका-२०७७). त्यांचे ठिकाणीं एवढें औदार्य असतें कीं, तें आपल्याकडे येणाऱ्याचे गुणदोष पाहत नाहींत. ('गुणदोष याती न विचारितां कांहीं । ठाव दिला पायीं आपुलियां ॥ ' तुका-२०३२) व त्याला सुखरूप करून टाकतात. त्यांच्याजवळ आत्मसुखाचा अमुप ठेवा असल्यामुळें ज्यांना तें आत्मसुख प्राप्त करून घ्यावें अशी इच्छा असते, त्यांनीं संतांचाच आश्रय करणें हेंच श्रेयस्कर ठरतें. ('तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥ ' तुका-३९२१).

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८५५८५ वि: निबंध
क्र. १२२२ नों. दि. २८/३/६०

प्रा. सोनोपंत दांडेकर यांचीं पुस्तकें

★ सार्थ ज्ञानेश्वरी

किंमत १५ रुपये

★ अभंग संकीर्तन

| | |
|---|---|
| भाग १ ला | किंमत २॥ रुपये |
| भाग २ रा | किंमत २ रुपये |
| भाग ३ रा | किंमत २॥ रुपये |

—: लवकरच प्रसिद्ध होणारीं :—

★ ईश्वरवाद

★ अध्यात्म शास्त्राचीं मूलतत्त्वें

प्रत्येक पुस्तकास पोस्टेज निराळें

महाराष्ट्राचें वैशिष्ट्यपूर्ण मासिक

प्रसाद

संपादक
प्रा. सोनोपंत दांडेकर
स. आ. जोगळेकर
यशवंत गोपाळ जोशी

वर्ष १३ वें सुरूं • वार्षिक वर्गणी फक्त ८ रुपये

प्रसाद प्रकाशन, ६८१/२३ सदाशीव पेठ, पुणें २.



मुद्रक : प्र. भा. काळे, प्रतिभा मुद्रणालय, टिळक रस्ता, पुणें २